3.3.2 Number of books and chapters in edited volumes/books published and papers published in national/ international conference proceedings per teacher during last five years (10)

| Sr. No. | Name of the teacher | Title of the book/chapters published | Title of the paper | Title of the proceedings of the conference | National / International | Year of publication | ISBN/ISSN number of the proceeding | Whether at the time of publication Affiliating Institution Was same Yes/NO | Name of the publisher |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 2017-18 | | | | | | | | | |
| 1 | Dr.Ravsaheb S Thoke | Daridryachi Samasya Page 379-388 | | Samkalin Prashna Ani Bhartiya Lokshahi | | Dec-17 | ISBN :978-93-87558-03-8 | | Meherbaba Publishers Nagpur |
| 4 | Prof. Dr. S. N. Deshmukh | Adivasi Bhagatil Kuposhan | | Samkalin Prashna Ani Bhartiya Lokshahi | | Dec-17 | ISBN :978-93-87558-03-8 | | Meherbaba Publishers Nagpur |

Smt. P.D. Patil Social Work College College Code 225

Scanned with OKEN Scanner

| | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 3 | Dr. Baliram P. Awachar | Bhrastachar Chinta aani Chintan | | Samkalin Prashna Ani Bhartiya Lokshahi | | Dec-17 | ISBN :978-93-87558-03-8 | | Meherbaba Publishers Nagpur |
| 4 | Prof. Navnath B. Bade | Bekary ek julant samajik samasya | | Samkalin Prashna Ani Bhartiya Lokshahi | | Dec-17 | ISBN :978-93-87558-03-8 | | Meherbaba Publishers Nagpur |

Smt. P.D. Patil Social Work College, Khadki, AKOLA
College Code 225

Principal,
Smt. Panchfulla Devi Patil
Social Work College,
Khadki, AKOLA

Scanned with OKEN Scanner

RAJYASHASTRA PRADHYAPAK PARISHAD (VIDARBHA PRANT)

*IN COLLABORATION WITH*

DEPARTMENT OF POLITICAL SCIENCE

SITABAI ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE, AKOLA

ORGANIZED

# One Day Interdisciplinary National Conference on
# Indian Democracy : Challenges and Remedies

## CERTIFICATE

This is to Certify that Prof./Dr./Mr./Ms./Mrs. प्रा. रावसाहेब ढोके.

of श्रीमती पंचफुलादेवी पाटील समाजकार्य महाविद्यालय, खडकी (बु) अकोला. has participated In the Interdisciplinary National Conference on **'Indian Democracy : Challenges and Remedies'** Organized by Rajyashastra Pradhyapak Parishad (Vidarbh Prant) & Department of Political Science, Sitabai Arts, Commerce & Science College, Akola, on **30th December 2017.** He/She submitted/ Presented a paper Entitled दारिद्र्याची समस्या.

Smt. P.D. Patil Social Work College, Khadki, AKOLA, College Code 225


**Dr. Ratan V. Rathod**
Organizing Secretory
Head, Dept. of Political Science,
Sitabai Arts, Comm. & Science College,
AKOLA

**Dr. R. D. Sikchi**
Principal & Convenor
Sitabai Arts, Comm. & Science College,
AKOLA

**Dr. Mrs. Alka Deshmukh**
Convenor & President
Rajyashastra Pradhyapak Parishad
(Vidarbha Prant)

Scanned with OKEN Scanner

# समकालीन प्रश्न आणि भारतीय लोकशाही



Scanned with OKEN Scanner

५९) लोकशाही शासन व्यवस्थेत प्रसारमाध्यमांची भूमिका ३०१
डॉ. शीला संजय खेडीकर
डॉ. अमर बोंद्रे
६०) राजकारणाचे गुन्हेगारीकरण: भारतीय लोकशाहीपुढील एक आव्हान ३०६
डॉ. बाळासाहेब जी. जोगदंड
६१) भ्रष्टाचार एक गंभीर समस्या ३१५
प्रा. देवेंद्रसिंग नरसिंग सोळंके
६२) भ्रष्टाचार एक जागतिक समस्या ३२८
डॉ. महेंद्र भिमराव भगत
६३) भारतीय लोकशाही शासनव्यवस्थे समोरील भ्रष्टाचार: एक आव्हान ३३२
डॉ. आर.डी.इंगोले
६४) भारतीय लोकशाही आणि भ्रष्टाचार ३३६
प्रा. सुजाता केने
६५) भ्रष्टाचार : चिंता आणि चिंतन ३४२
डॉ. बळीराम परशराम अवचार
६६) भ्रष्टाचार : एक सामाजिक अध्ययन ३४९
प्रा. स्नेहल मनिष चिमणकर (खंडारे)
६७) भ्रष्टाचार : भारतीय लोकशाही समोरील एक आव्हान ३५५
प्रा. श्रीहरी मा. सानप
६८) अर्थगैरव्यवहाराची समिक्षा....! ३५९
डॉ. पोर्णिमा मेश्राम (गणविर)
६९) ग्रामीण भारतातील बेकारी, दारिद्र्य आणि शासकीय योजना ३६३
प्रा. कु. दिपाली श्रीराम घोगरे
७०) बेकारी एक ज्वलंत सामाजिक समस्या ३७१
प्रा. नवनाथ बंकट बडे
७१) दारिद्र्याची समस्या ३७९
प्रा. रावसाहेब ठोके
७२) भारतातील दारिद्र्य निर्मूलन : समस्या व उपाय ३८९
डॉ. संदीप भिमराव काळे
७३) वस्तू व सेवा कराचे महत्त्व ३९५
डॉ. प्रसन्नजीत गवई


Smt. P.O. Patil Social Work College College Code 225

Scanned with OKEN Scanner

# दारिद्र्याची समस्या

प्रा. रावसाहेब ठोके,
श्रीमती पंचफुलादेवी पाटील समाजकार्य महाविद्यालय,
खडकी बु. अकोला

## प्रस्तावना

सुखी समृध्द सामाजिक जीवन जगणे हे कोणत्याही समाजाचे अंतिम उद्दिष्ट असते. पण या उद्दिष्टास बाधा असणाऱ्या काही समाजशास्त्रीय – अर्थशास्त्रीय घटना कोणत्याही समाजामध्ये विद्यमान असतात. भारतासारख्या साधनसंपत्तीच्या बाबतीत श्रीमंत असणाऱ्या देशातील जवळपास निम्मी लोकसंख्या ही किमान आवश्यक जीवनमान जगण्यापासून वंचित आहेत्र स्वातंत्र्योत्तर काळात आपण आतापर्यंत आठ पंचवार्षिक येजना राबविल्या, 'गरीबी हटावो', 'वीस कलमी कार्यक्रम' राबविले. कोट्यावधी रुपये खर्च केले, याचे फलित काय?

भारतात ब्रिटीश येण्यापूर्वी इथली खेडी स्वयंपूर्ण होती. ब्रिटीशांनी आपले पाय भारतात रोवल्यानंतर मात्र त्यांनी स्वीकारलेल्या विविध धोरणांपुढे इथे दारिद्र्य ही अविकसित देशांपुढील गंभीर समस्या आहे. दुसऱ्या महायुध्दानंतर नव्याने स्वतंत्र झालेंल्या आशिया, आफ्रिका व लॅटीन अमेरिका या खंडातील अविकसित देशांचा विकास घडवून आणण्यासाठी व त्यांची दारिद्र्याच्या दुष्टचक्रातून मुक्तता करण्यासाठी 'विकासाचे अर्थशास्त्र' ही एक अर्थशास्त्राची स्वतंत्र शाखा विकसित झाली. तथापी, या दारिद्र्यात तेथील समाजसंरचना, तेथील रुढी, परंपरा, मुल्यव्यवस्थापन जबाबदार असते. एका समाजातील दारिद्र्य दुसऱ्या समाजातील समृध्दीस बाधा आणते. याच कारणासाठी समाजशास्त्रज्ञांना पण दारिद्र्याचा अभ्यास करणे आवश्यक वाटते. आता आपण दारिद्र्य ही संकल्पना समजून घेऊत्र

## दारिद्र्य

दारिद्र्य ही संकल्पना वेगवेगळ्या दृष्टीकोनातून स्पष्ट केली जाते. दारिद्र्याला गरीबी असेही म्हटले जाते. दारिद्र्याचा संबंध पैशाच्या अभावाशी आहे. दारिद्र्याची व्याख्या करतांना ती वेगवेगळ्या दृष्टीकोनातून



Smt. P.D. Patil Social Work College
College Code 225

Scanned with OKEN Scanner

केली जाते. पहिला म्हणजे जीवन निर्वाहासाठी आवश्यक असणारा पैसा. यावरुन 'अन्न, वस्त्र, निवारा या मूलभूत गरजांची पूर्तता करण्याची क्षमता नसणे म्हणजे दारिद्रय होय.' अशी व्याख्या करतात ज्या समाजामध्ये सदस्यांच्या जीवन निर्वाहविषयक किमान आवश्यक गरजा भागविण्याचीही परिस्थिती नसते तो समाज दारिद्रययुक्त समाज असे म्हटले पाहिजे. ज्यांना आपल्या मुलभूत गरजा भागविता येत नाही. त्यांना दरिद्री असे म्हणतात. आपण निर्वाहविषयक किमान मुलभूत गरजा असे म्हणतो तेव्हा अन्न, वस्त्र, निवारा याबरोबरच माणसाच्या आरोग्याशी संबंधित गरजांचाही पाणी, शिक्षण त्यात समावेश होतो हे लक्षात घेतले पाहिजे. अर्थात त्यासाठी किमान उत्पन्नाची आवश्यकता असते. जागतिक बँकेच्या अहवालानुसार भारतात दारिद्रयरेषेखाली जीवन जगणाऱ्यांचे प्रमाण १९८८ मध्ये ग्रामीण समाजात ४१.७ कोटी लोक तर नागरी समाजात ३३.६ टक्के लोक होते. येथे दारिद्रय रेषा ही संकल्पना समजून घेणे आवश्यक ठरते. किमान जीवन जगण्यासाठी मुलभूत प्राथमिक वस्तू व सेवांची उपभोग खर्चाची कमीत कमी पातळी ज्याने दर्शविली जाते. तिला दारिद्रय रेषा म्हणतात. प्रचलित किंमत पातळीच्या दृष्टीने विचार केला तर ग्रामीण भागातील व्यक्तीचे दरमहा उत्पन्न रु. १२७ इतके आणि नागरी विभागातील व्यक्तीचे दरमहा रु.१४९ इतके उत्पन्न त्याचा अन्न, वस्त्रादी किमान गरजा भागविण्यासाठी आवश्यक आहे.

### १) सापेक्ष दारिद्र

एका उत्पन्न गटातील व्यक्तीची दुसऱ्या उत्पन्न गटातील व्यक्तीशी तुलना केली जाते. या तुलनेच्या आधारे कमी उत्पन्न गटातील व्यक्ती किंवा समूह किंवा देश गरीब मानले जातात. सापेक्ष दारिद्रय हे जगातील श्रीमंत व वैभवशाली देशातही आढळून येते. ही संकल्पना आर्थिक विषमतेवर आधारलेली आहे. उदा. इंग्लंडच्या तुलनेत जपान श्रीमंत ठरेल तर भारत बांग्लादेशाच्या तुलनेत श्रीमंत ठरतो. उच्च, प्रबळ जातींच्या संदर्भात कनिष्ठ जाती दरिद्री ठरतात. फक्त आदिवासींचा विचार केला तर स्थिरस्वरुपी शेती करुन स्थायी झालेले आदिवासी हे भटक्या जमातींपेक्षा श्रीमंत ठरतात. या संकल्पनेवरुन दारिद्रयाची नीट कल्पना येत नाही म्हणून निरपेक्ष दारिद्रय ही संकल्पना महत्वाची ठरते.

### निरपेक्ष दारिद्रय

भारतामध्ये सापेक्ष दारिद्रय आढळते या संकलपनेमध्ये भिन्न व्यक्ती किंवा वेगवेगळ्या समुहामध्ये उत्पन्नाची तुलना न करता एखादी व्यक्तीच दरिद्री आहे किंवा नाही हे ठरवण्याचा प्रयत्न केला जातो. माणसाला माणूस म्हणून ती व्यक्ती निरपेक्षपणे दरिद्री आहे असे मानले जाते. किमान जीवनमानाचा विचार करतांना वर म्हटल्याप्रमाणे अन्न, वस्त्र, निवारा या मुलभूत गरजा व्यतिरिक्त पाणी, आरोग्य, शिक्षण, मनोरंजन याची गरजांचा विचार करावा लागतो. किमान आवश्यक गरजांची पूर्तता करण्यासाठी प्रचलित किंमतीनुसार किती खर्च येईल याचा विचार निरपेक्ष दारिद्रयात केला जातो. अशा प्रकारे निर्धारित केलेल्या खर्चापेक्षाही कमी माणसी खर्च असलेली लोकसंख्या दारिद्रयामध्ये आहे असे म्हटले जाते.

### दारिद्रयाचे स्वरुप आणि तीव्रता

भारतातील दारिद्रयाच्या समस्येची तीव्रता डॉ. दांडेकर आणि डॉ. रथ तसेच वित्त आयोग, जागतिक बँक, इत्यादींनी केलेल्या अभ्यासावरुन स्पष्ट होते. उदा. १९९२ साली २६.९ कोटी ग्रामीण समाजातले तर ८.६

Smt. ...D. Patil Social Work College
College Code 225

Scanned with OKEN Scanner

कोटी शहरी समाजातले म्हणजे एकूण ३५.५ कोटी लोक दारिद्र्य रेषेखाली होते. तर देशातील एकूण लोकसंख्येशी दारिद्र्य रेषेखाली लोकसंख्येचे शेकडा प्रमाण ४०.७ इतके होते. भारतातील दारिद्र्याचा तीव्रतेचा अभ्यास करतांना त्यात काही अंतर्गत विरोधाभास आहे असे वाटते. एकूण जगातील औद्योगिक उत्पादनाचा विचार केला तर भारताचा क्रमांक हा एकोणिसावा लागतो आणि एकूण राष्ट्रीय उत्पन्नाचा विचार केला तर हाच क्रमांक १२ वा लागतो. आणि तरीही भारतामध्ये मोठ्या प्रमाणावर दारिद्र्य आहे. हे दारिद्र्य समाजाच्या प्रत्येक गटात व देशाच्या प्रत्येक भागात पसरलेले आहे. स्वातंत्र्योत्तर काळात आर्थिक दृष्टोकानाच्या विकासातून काही योजना हाती घेण्यात आल्या. उद्योगधंद्यांना प्रोत्साहन देण्यात आले. हरितक्रांती, गरीबी हटाव व इतर विकासाभिमुख कार्यक्रम आखल्यामुळे भारताचा विकास काही दर वाढला हे खरे आहे. पण त्याच विशिष्ट बरोबर दरडोई उत्पन्नात झपाट्याने घट झाली. समुहांचा राहणीमानाचा दर्जा खालावला. उदा. १९८१ साली जागतिक बँकेने जागतिक विकासाचा एक अहवाल प्रसिध्द केला या अहवालामध्ये जगातील सर्वात दरिद्री अशा दहा देशांची यादी केली होती. या यादीमध्ये बांगलादेश दुसऱ्या क्रमांकावर तर भूतान हा सर्वात शेवटी होता. आश्चर्य म्हणजे भारताचा क्रम याबाबतीत केवळ चीननंतरच नव्हे तर पाकिस्तान व श्रीलंकेपेक्षाही खाली होता. यासंदर्भात नेमके दरिद्री कोणाला म्हणावे या प्रश्नाचे उत्तर जाणून घ्यावे लागते. ग्रामीण भारतातील दारिद्र्याच्या संदर्भात (१) भूमिहीन शेतमजूर (२) २.५ हेक्टरपेक्षा कमी जमीन असणारे सीमांत शेतकरी (३) २.५. ते ५ ते ५ हेक्टरपर्यंत जमीन असणारे लहान शेतकरी (४) परंपरागत रोजगार गामवलेले ग्रामीण कारागीर (५) ग्रामीण उद्योग व कारागीरांकडे काम करणारे मजूर (६) भटक्या व मागास जमातीचे लो (७) आदिवासी व जंगलात राहणारे लोक हे गरीब समजले जातात. तर नागरी भागातील दरिद्री लोकांमध्ये डॉ. दांडेकर व रथ यांच्यामते मुख्यत: ग्रामीण समाजातून नागरी समाजात स्थलांतरित झालेल्या लोकांचा समावेश होतो. नागरी भागातील दारिद्र्य हे ग्रामीण दारिद्र्याचे अपत्य होय. शेतीच्या होणाऱ्या वाटण्या, दुष्काळी व वेभरवशी शेती, उत्पादन व शेत दरमालाची अनिश्चितता, बलुतेदारीचा ऱ्हास इत्यादी कारणांमुळे ग्रामीण समाजातून नागरी समाजात मोठ्या प्रमाणावर लोक पोटापाण्यासाठी रोजगाराच्या आशेने स्थलांतरीत होतात. पण या सर्वांनाच रोजगार मिळतो असे नाही. ज्यांना रोजगार मिळतो तो अर्थातच अन्न, वस्त्र, निवारा, करमणूक इत्यादीला तो पुरेसा पडत नाही. याचा परिणाम म्हणून नागरी समाजात झोपडपट्ट्या गलिच्छ वस्त्या वाढतात. आणि अशा वस्त्यांतून पिण्याचे पाणी, सांडपाणी, स्वच्छतागृह, इत्यादींबाबत अतिशय शोचनीय परिस्थती असते.

वेळोवेळी राबविण्यात आलेल्या पंचवार्षिक योजनांमध्ये दारिद्र्य कमी करण्यासाठी कोटयावधी रुपये खर्ची घातले जातात. १९९०-९१ च्या अंदाज पत्रकामध्ये भारतातील दारिद्र्य रेषेखाली असणाऱ्या लोकांची संख्या ३० कोटी असावी असा शासकीय अंदाज होता. तथापी अर्थतज्ञ, जागतिक बँकेच्या मते ही लोकसंख्या ४० कोटी इतकी असावी.

भारताच्या दारिद्र्याचा विचार करतांना आपल्याला भारतावर असलेल्या कर्जाचाही विचार केला पाहिजे. जागतिक बँकेच्या अहवालानुसार कर्जबाजारी असणाऱ्या ९६ देशांमध्ये भारताचा चवथा क्रमांक लागतो. १९८८-८९ मध्ये भारतावर पन्नास हजार कोटी रुपये कर्ज होते. मार्च १९९१ मध्ये हेच कर्ज १ लाख



Late P.D. Patil Social Work College, College Code 225, Khadki, AKOLA
Scanned with OKEN Scanner

८० हजार कोटी रुपये झाले होते. १९८७-८८ सालामध्ये भारतीयाचे दरडोई उत्पन्न वार्षिक रु. ३,२८४ इतके होते. तर दर वार्षिक दर दरडोई कर्ज रु. १,३१३ इतके होते.

थोडक्यात, सातत्याने वाढणारी लोकसंख्या, त्यापाठोपाठ येणारी बेकारी, ग्रामीण समाजातून नागरी समाजात होणारे स्थलांतर, एकीकडे विकासाचा वेग वाढणे तर दुसरीकडे दारिद्र्य रेषेखालील लोकसंख्या नियंत्रित करण्यात अपयश येणे. दिवसेंदिवस भारतावरील कर्जाचा आकडा फुगत जाणे इ. मुळे ही समस्या आजही सोडविता आलेली नाही किंवा तिचे गांभीर्यही कमी करता आलेली नाही. असे का? यासाठी आपल्याला दारिद्र्याच्या कारणांचा विचार केला पाहिजे.

## दारिद्र्याचे कारण

### वैयक्तिक कारणे

स्पेन्सर, कार्निजी वगैरे विचारवंतांच्या मते दारिद्र्याचे कारण हे वैयक्तिक आहे. एखाद्या व्यक्तीची श्रीमंती किंवा गरीबी ही त्याच्या कर्तृत्वावर अवलंबून असते. स्पर्धेच्या युगामध्ये अस्तित्वासाठी झगडा, अटळ आहे. जे सशक्त, कार्यक्षम आहेत तेच यशस्वी होतात. याउलट ज्यांच्याजवळ, जिद्द, प्रेरणा, चिकाटी इत्यादींचा अभाव आहे. जे निष्क्रिय आहेत अशा व्यक्ती अयशस्वी होतात. या संदर्भात मॅक्स वेबर यांनी युरोपमधील भांडवलशाहीचा विकास झाला याच आचार संहितेच्या संदर्भात केलेले स्पष्टीकरण विचारात घेण्यासारखे आहे. प्रॉटेस्टंट आचारसंहितेमध्ये कर्तव्य हीच पूजा, वेळ म्हणजेच पैसा, एक पैसा वाचविणे म्हणजे एक पैसा मिळविण्यासारखेच आहे, प्रामाणिकपणा सचोटी यासारख्या वैयक्तिक गुणांचा समावेश आहे. साहजिकच या गुणांच्या अभावी दारिद्र्य निर्माण होऊ शकते.

### दारिद्र्याची उप-संस्कृती

ऑस्करलेवीस यांनी १९५९ मध्ये दारिद्र्याची संस्कृती ही संकल्पना लोकप्रिय केली. त्यांच्यामते दारिद्र्याचीही एक जीवनपध्दती किंवा संकृती असते. दरिद्री वर्गातील घटकांची स्वत:ची अशी काही मूल्य श्रध्दा नीती नियमाने असतात. गरीबी हटविण्याचे कितीही प्रयत्न केले तरी दारिद्र्याची ही संस्कृती त्या प्रयत्ना आड येते. उदा. जमीन ही आपली आई आहे जमीन नांगरणे म्हणजे साक्षात आईच्या पोटात फाळ खुपसणे या सारखी श्रध्दा काही आदिवासींमध्ये आहे. त्यामुळे ते जमीन नांगरात नाही. पिढ्यानपिढ्या यासारख्या मूल्यांचाच पाठपुरावा केला जातो. ठेविले अनंते तैसेचि रहावे। चित्ती असो द्यावे समाधान ही वृत्ती हा या संस्कृतीचाच एक भाग होय. थोडक्यात समाजातील दरिद्री वर्गाचे दारिद्र्याबद्दल तत्वज्ञान त्यांची संस्कृती ही त्यांना दारिद्र्यातच ठेवते.

### सामाजिक संरचनात्मक कारणे

प्रत्येक समाजाची एक संरचना असते. या संरचनेचे भूमिका, समूह आणि उपसमूह, नियमने आणि मूल्ये नसतात या सामाजिक संरचनेद्वारे काही प्रकट अप्रकट कार्य पार पाडली जातात. तसेच अनुकूल आणि प्रतिकूल कार्य पण पार पाडली जातात. समाजशास्त्रांच्या मते सामाजिक संस्था अर्थव्यवस्था शिक्षणाचा अभाव, दीर्घकाळ बेकारी, सामाजिक विघटन, सामाजिक विषमता आणि एकूणच समाजातील प्रतिकूल पर्यावरण यासारख्या कारणांमुळे दारिद्र्य निर्माण होते. समाजामध्ये अपेक्षित सामाजिक परिवर्तन घडून येत



Smt. P.D. Patil Social Work College
College Code 225
Khadki, AKOLA

Scanned with OKEN Scanner

नाही. किंवा वयक्तिक हितसंबंध जोपासण्यासाठी या परिवर्तन प्रक्रियेमध्ये अडथळे निर्माण केले जातात याचा परिणाम म्हणजे समाजामध्ये दारिद्र्य निर्मितीला अनुकूल परिस्थिती निर्माण होते.

## आर्थिक कारणे

आर्थिक कारणांमध्ये आपल्याला खालील कारणांचा विचार करावा लागतो.

## देशाचा अपुराविकास

भारताच्या आर्थिक विकासाचा मंद वेग हे भारतातील दारिद्र्याचे प्रमुख कारण आहे. भारताचे राष्ट्रीय उत्पन्न इतर विकसित देशांच्या तुलनेत बरेच कमी आहे याचे कारण हेच आहे. राष्ट्रीय उत्पन्न कमी असल्यामुळे प्रत्येकाच्या वाटयाला येणारे दरडोई उत्पन्न अत्यंत कमी आहे. सन १९५०-५१ पासून नियोजनाचा स्वीकार करुनही देशाच्या आर्थिक विकासाचा वेग फारसा वाढला नाही ही बाब प्रकर्षाने ग्रामीण क्षेत्रात आढळते. शेती व लघुउद्योगाच्या प्रगतीमध्ये भांडवली गुंतवणूक दुर्लक्षली गेल्याने दारिद्र्य वाढले.

## वाढती लोकसंख्या

भारताची लोकसंख्या सातत्याने वाढत आहे. त्यामानाने राष्ट्रीय उत्पन्न वाढत नाही. याचा परिणाम म्हणजे दरडोई उत्पन्नात विशेष भर पडली नाही. त्यामुळे दारिद्र्यात भरच पडते. भारताची लोकसंख्या वाढत असल्याने १९५१ – ५१ पासून नियोजनाचा स्वीकार करुनही देशाच्या आर्थिक विकासाचा वेग फारसा वाढला नाही ही बाब प्रकर्षाने ग्रामीण क्षेत्रात आढळते. शेती व लघुउद्यागाच्या प्रगतीमध्ये भांडवली गुंतवणूक दुर्लक्षली गेल्याने दारिद्र्य वाढले.

## बेकारी व अर्धबेकारी

देशाच्या मंद आर्थिक विकासामुळे वाढत्या लोकसंख्येला रोजगार उपलब्ध होत नाही. त्यामुळे असंख्य लोकांना व अर्धबेकारीच्या समस्येला तोंड द्यावे लागते. बेकारीच्या काळात दुसरे कोणतेही पर्याय साधन उपलब्ध नसल्याने दारिद्र्य निर्माण होते. १९९० मध्ये सुरवातीस २.८० कोटी लोक बेकार होते. तर आठव्या पंचवार्षिक योजनेत हाच आकडा ३.७० कोटीवर गेला होता. नवव्या योजनेच्या शेवटी १९९७ ते २००२ ही बेकारी १० कोटी ६० लाखावर पोचेल. जागतिक बँकेचे माजी अध्यक्ष रॉबर्ट मॅकनमारा यांच्या मते बेकारी दारिद्र्यात भर घालते.

## गरिबी निर्माण होण्याची व्यक्तिगत कारणे

## मानसिक ताण

व्यक्ती मानसिकदृष्टया वैफल्यग्रस्त असेल तर ती स्वतःची सामाजिक प्रगती करु शकत नाही. त्यांच्यात कायम संशयी वृत्ती वाढलेली असते. त्यामुळे कोणतेही काम करण्यास ते लायक राहत नाहीत आणि गरिबाचे शिकार बनतात. भिकाऱ्यांमध्ये बराचसा वर्ग मानसिक विकलांग लोकांचा वर्ग आहे.

## अपघात

अपघाताच्या माध्यमातून व्यक्तीच्या जीवनात एखादी दुर्घटना घडली तर तिचे परिणाम प्रदीर्घ काळ व्यक्तीला भोगावे लागतात. व्यक्ती लंगडी, बहिरी, आंधळी झालेली असेल तर साहजिकच दारिद्र्याची कुऱ्हाड तिच्यावर कोसळते.

P.D. Patil Social Work College
College Code 225



Scanned with OKEN Scanner

### व्यक्तिमत्व

व्यक्तीचे व्यक्तिमत्व कसे आहे, यावरही त्याची आर्थिक परिस्थिती अवलंबून आहे. व्यक्ती जर समाजाच्या परिस्थितीशी जुळवून घेणारी असेल तर तिचा विकास वेगाने होतो. त्यामानाने असहिष्णु, हेकेखोर, गर्विष्ठ लोकांना आपला आर्थिक विकास करावयास वेळ लागतो.

### नैतिक अध:पतन

व्यक्तीचे आयुष्य केवळ पैशावर चालत नाही, तर काही मूल्यव्यवस्थेवर चालते. एके काळी बाई-बाटलीच्या नादी लागणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या समाजात बरीच होती. त्यामुळे त्यांच्या भावी आयुष्यात गरिबी आली. नैतिक अध:पतनामुळे व्यक्ती स्वत:च्या गुर्मीत राहतात व इतर समाजाचा कोणताही विचार करीत नाहीत. परिणामी, काही काळानंतर गरिबी येते.

### सवयी व व्यवसनाधीनता

व्यक्तीची व्यसने गरिबी निर्माण करण्यास मोठ्या प्रमाणावर कारणीभूत आहेत. मद्यपानाची सवय, वेश्यागमन करण्याची सवय, जुगार व पत्ते खेळण्याची सवय यामुळे व्यक्ती गरीब बनसते, असे लक्षात येईल.

### गुन्हेगारी प्रवृत्ती

अपराध ही प्रवृत्ती समाजासाठी व व्यक्तीसाठी विपथगामी मानली जाते. एखादी व्यक्ती एकदा गुन्हेगार म्हणून सिध्द झाल्यानंतर तिच्यावरचा समाजाचा विश्वास उडतो व तिला कोणतेही काम दिले जात नाही. परिणामी, तिच्यावर दारिद्राची वेळ येते.

### आळशी वृत्ती

हे देखील दारिद्रय येण्याचे महत्वाचे कारण आहे.

### रोग

काही आजार व्यक्तीला समाजात राहू देत नाहीत, तर असामाजिक बनवितात. उदा. कुष्ठरोग झालेली व्यक्ती स्वत:च्या घरात राहू शकत नाही. ती दरिद्री होते व तिला भीक मागण्याशिवाय दुसरा इलाज राहात नाही.

### वृध्दावस्था

या कालखंडात व्यक्तीची कार्यक्षमता कमी होते. व्यक्ती कोणतेही आर्थिक कार्य करीत नाही. जीवनाच्या या अखेरच्या अवस्थेत अनेक व्यक्ती निर्धन बनताना दिसून येतात.

### दारिद्रय निर्मूलनाचे उपाय

भारतातील दारिद्राचा प्रश्न बहुआयामी आहे. दारिद्रय निर्मूलनाकरीता किंवा दारिद्राच्या समस्येची तीव्रता कमी करण्याकरीता स्वातंत्र्योत्तर काळात केंद्र व राज्यसरकारने पुढील उपाय अंमलात आणले आहेत. (१) पंचवार्षिक योजना (२) राष्ट्रीयकरण (बंद पडलेल्या कापड गिरण्या, प्रवासी मोटार वाहतूक, खाणी इत्यादी उद्योग आर्थिक नुकसान सहन करुन शासनाने चालविले, इत्यादी) (३) वीस कलमी कार्यक्रम (४) आय.आर.डी.पी. (Intergrated Rural Development Programme) एकात्मिक ग्रामीण विकास कार्यक्रम, अंत्योदय व जवाहर रोजगार योजना कार्यक्रम.



Smt. P.D. Patil Social Work College, College Code 225, Khadki Akola

Scanned with OKEN Scanner

दारिद्र्य निर्मूलनाच्या या सर्व उपायांची अंमलबजावणी गेल्या ५० वर्षापासून सुरु आहे. तरीही भारतातील दारिद्र्याचे निर्मूलन झाले नाही किंवा दारिद्र्याच्या समस्येची तीव्रताही कमी झाली नाही. यामुळे सरकारने दारिद्र्य निर्मूलनासाठी योजलेले उपाय हे नेहमीच टिकेचा विषय ठरतात. उदा. दारिद्र्य निर्मूलनासाठीच्या सरकारने तयार केलेल्या योजना (Planning) मूळातच सदोष आहेत. याउलट दारिद्र्य निर्मूलनासाठीच्या सरकारने तयार केलेल्या योजना उत्तम आहेत. सदोष किंवा वाईट नाहीत. परंतु त्यांची नीट व व्यवस्थित अंमलबजावणीच होत नाही. सर्व दोष योजनांच्या अंमलबजावणीमध्येच आहे. दारिद्र्य निर्मूलनासाठी सरकारने योजलेल्या उपायांबाबत अशाप्रकारची परस्परविरोधी मते सतत व्यक्त होत असल्याचे आपणास दिसून येते.

गरिबी किंवा दारिद्र्य ही सापेक्ष संकल्पना असली तरी सर्वसामान्यपणे ज्या व्यक्तींच्या मूलभूत गरजा पूर्ण होत नाहीत, त्यांना दरिद्री म्हणावे लागेल. दारिद्र्य दूर करण्यासाठी पुढील काही उपाययोजना करता येतात व वेगवेगळ्या पंचवार्षिक योजनांमार्फत या दृष्टीने प्रयत्न करण्यात आलेले आहेत.

### उत्पादनामध्ये वाढ

भारतातील दारिद्र्य दूर करावयाचे झाल्यास उत्पादकशक्ती वाढीला लावणे आवश्यक आहे. भारतातील प्रमुख उद्योग शेती आहे व या शेती उद्योगात भूमीचे न्यायपूर्ण रीतीने होणे आवश्यक आहे. भारतातील शेतकऱ्यांना नवीन तंत्रज्ञानाने शेती करावयास लावल्यास दारिद्र्य कमी होऊ शकेल.

### रोजगाराची हमी

सरकारी व निमसरकारी प्रकल्पामध्ये व्यक्तीला रोजगाराची हमी व सामाजिक सुरक्षा मिळणे आवश्यक आहे.

### धर्मांधता कमी करणे

अतिधार्मिकता व्यक्तीला अधिक पैसा खर्च करावयास भाग पाडते. धर्म पाळावा, परंतु धर्मांधता नसावी, असा विचार रुजविणे आवश्यक आहे.

### सामाजिक रुढी-परंपरात बदल करणे

आज भारतीय व्यक्तीची जी अवस्था आहे ती अशी, की व्यक्ती आयुष्यभर जो पैसा मिळविते त्यापैकी जवळपास ६० टक्के रक्कम ती रुढी-परंपरांचे पालन करण्यामध्ये खर्च करते. हुंडापध्दती, बालविवाह करवून देणे, जेवणावळी यामध्ये व्यक्तीचा फार मोठ्या प्रमाणावर खर्च होतो.

उत्पन्नाचा वाटा घेऊन शेतावर सालदार म्हणून काम करणाऱ्या शेतकऱ्यांना संरक्षण देण्यात आले पाहिजे.

देशातील नापीक, ओसाड व खार जमिनी लागवडीखाली आणण्याचे प्रयत्न झाले पाहिजेत. एका अंदाजानुसार अशा योजनांमुळे ५ लाख कुटुंबीयांची रोजगाराची सोय होऊ शकेल.

शेतकऱ्यांना व लहान उद्योजकांना वेळोवेळी अर्थपुरवठा करणे आवश्यक आहे.

### पाचव्या पंचवार्षिक योजनेतील दारिद्र्य निवारणाचा कार्यक्रम (१९७४-१९७९)

पाचव्या पंचवार्षिक योजनेत गरिबी निवारण करण्यासाठी पुढील कार्यक्रमांचा समावेश केला गेला.

* उत्पादनाची नवीन तंत्रे वापरात आणणे.

Smt. P.D. Patil Social Work College College Code 225



Scanned with OKEN Scanner

* माध्यमिक शिक्षणात व्यावसायिक शिक्षण व प्रत्यक्ष अनुभव.
* १४ वर्षापर्यंतच्या मुलांना प्राथमिक शिक्षणाची सोय.
* लघुउद्योग व ग्रामोद्योग यांचा विकास.
* पिण्याच्या पाण्याची समस्या असल्यास पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करणे.
* भूमिहिन शेतकऱ्यांना घरबांधणीसाठी जागा देणे.
* लहान शेतकऱ्यांना आर्थिक परिस्थिती सुधारण्यासाठी मदत करणे.
* गलिच्छ वस्त्यांची सुधारणा करणे.

**वस्तुस्थिती**

दारिद्र्यामुळे आर्थिक विषमता निर्माण होते. भरमसाठ वाढलेल्या महागाईत मध्यमवर्गीयांनासुध्दा भागवणे कठीण होऊन बसले आहे. भारतासारख्या गरीब आणि उष्ण हवामान असलेल्या देशात माणसाला जगण्यासाठी दर दिवशी किमान २२५० उष्मांक मिळवून देणारे अन्न-धान्य, डाळी, दूध, भाज्या इत्यादी लागते व देशभराचा विचार करता या किमती सर्वत्र वेगळ्या असतात.

**दारिद्र्य रेषेखालील लोकांबाबत खालीलप्रमाणे म्हणता येईल**

* दारिद्र्य रेषेखालील बहुसंख्य लोक ग्रामीण भागात राहतात. त्यात प्रामुख्याने छोटे शेतकरी, भूमिहीन मजूर जास्त असतात.
* ग्रामीण भागातील गरिबांचा मुख्य प्रश्न बेकारीपेक्षा कमी उत्पादनक्षम व्यवसाय हा असतो. त्यामुळे रोजगार असूनही पोटभर अन्न मिळत नाही.
* खेड्यातील लोक शहरात गेल्याने तिथे बेकारीचा प्रश्न निर्माण होतो शिवाय असंघटीत क्षेत्रातील व्यक्तींना नियमित काम नसते.

याला कारण म्हणजे तुटपुंज्या जमिनीवर शेतकरी कुटुंबे घरातील मुलांना मजुरी करायला लावतात. त्यामुळे पुढच्या पिढ्यात वाढते. एकरी उत्पादन वाढत नाही. त्यासाठी खते, सुधारित बी-बियाणे, कर्जपुरवठा यांची गरज असते. आवश्यक तो तांत्रिक सल्ला मिळायला हवा. सिंचनाची सोय व्हावयला हवी. नैसर्गिक साधनसामग्रीचा अतिरेकी वापर झाल्याने त्याचा हवामानावर परिणाम झाला. पर्यायाने शेतीवर परिणाम झाला.

नैसर्गिक आपत्ती व संकटांमुळेही वित्तहानी होते. कुटुंबांना आपले वर्चस्व गमवावे लागते. त्यातूनही दारिद्र्य येते. अशा वेळी शासकीय किंवा स्वयंसेवी संस्थांकडून मिळणारी मदत तुटपुंजी असते.

**शासकीय योजना**

सन २००७ मध्ये शहरात दारिद्र्याचे प्रमाण १५.१ टक्के, तर ग्रामीण भागात २१.१ टक्के आहे व भारतात हे प्रमाण १९.३ टक्के आहे. भारत सरकारने विविध पंचवार्षिक योजनांतर्गत अनेक विकास व रोजगार कार्यक्रम सुरु केले आहेत. यात काही प्रमुख कार्यक्रम लागू करण्यात आले आहेत.

* अधिक उत्पन्न देणाऱ्या वाणांचा कार्यक्रम
* प्रधानमंत्री रोजगार योजना

Smt. P.D. Patil Social Work College Code 225 Khadki, AKOLA



Scanned with OKEN Scanner

* महिला समृध्दी योजना
* इंदिरा महिला योजना
* राष्ट्रीय सामाजिक साहाय्यता योजना
* गंगा कल्याण योजना
* जवाहर समृध्दी योजना
* प्रधानमंत्री ग्रामीण समन्वित शहरी गरिबी निर्मुलन योजना
* स्वर्णजयंती ग्रामीण स्वयंरोजगार योजना
* अन्नपूर्णा अन्न योजना (२०००)
* अंत्योदय अन्न योजना (२००१)
* संपूर्ण ग्रामीण रोजगार योजना (२००१)
* स्वर्णजयंती शहरी रोजगार योजना (१९९७)
* प्रधानमंत्री ग्रामोदय योजना (२०००-०१)
  अ) प्रधानमंत्री ग्रामोदय योजना
  ब) प्रधानमंत्री ग्राम सडक योजना

या योजना घर, पिण्याचे पाणी, रस्ता या सुविधा पुरविण्यासाठी आहेत.

* कृषी श्रमिक सामाजिक सुरक्षा योजना (२००१)
* कामाच्या बदल्यात अन्न धान्य कार्यक्रम (२००१)
* जयप्रकाश नारायण अन्न गॅरंटी योजना (२००२)
* स्व-जलधारा योजना (२००२)
* राष्ट्रीय जननी सुरक्षा योजना (२००३)
* वरिष्ठ नागरिक बचत योजना (२००४)

याशिवाय जनश्री विमा योजना ही समाजातील गरीब वर्गांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्याकरीता सुरु झाली. १८ ते ६० वर्षे वयोगटातील वृध्द लोकांना पेन्शन मिळते.

शहरात गलिच्छ वस्त्यांमध्ये दारिद्र्य रेषेखाली जीवन जगणाऱ्या लोकांसाठी निवासी गाळ्यांची निर्मिती करणे, शहरातील पर्यावरण स्वच्छ राहावे यासाठी सामुदायिक शौचालये बांधणे.

जयप्रकाश नारायण रोजगार गॅरंटी योजना व राष्ट्रीय अपंगत्व कोष योजना सुरु करण्यात आल्या. वरिष्ठ नागरीक बचत योजना २००४ ला सुरु करण्यात आली व त्यावर ९ टक्के व्याज देण्यात येते.

**निष्कर्ष**

शासनाकडून दिला जाणारा निर्वाह भत्ता वेळेवर न मिळणे, त्यात भ्रष्टाचाराची शक्यता, मुळातच तो तुटपुंजा आहे. त्यामुळे अशा प्रकारच्या उपायांनी दारिद्र्य निर्मुलन करता येणे अवघड आहे.

Smt. P. D. Patil Social Work College Code 225



Scanned with OKEN Scanner

ग्रामीण भागात बचत गटाच्या रुपाने संघटित शक्ती उभी केली आहे. व्यावसायिक प्रशिक्षण देऊन कुटुंबाला हातभार लावण्याचे उपाय सुरु आहेत. परंतु त्या उत्पादनालाही बाजारपेठ न मिळाल्याने तोच प्रश्न पुन्हा आहे. त्यामुळे त्यांना नवीन व्यवसाय करता येत नाही.

आदिवासी क्षेत्रातही सुधारणा झाली नाही. ज्या ठिकाणी झूम पध्दतीने शेती केली जाते. तिथे आर्थिक वाढीची प्रक्रिया अशक्य आहे.

भारताची भरमसाठ वाढणारी लोकसंख्या त्यामुळे, अन्न, वस्त्र, निवारा, सार्वजनिक आरोगय, शैक्षणिक सोयी याची परिस्थिती गंभर स्वरुपाची आहे. बालमृत्यूचे प्रमाण जोवर कमी होणार नाही तोवर जनन दर कमी होणार नाही व सक्षम, निरोगी प्रजा असेल तेव्हा काम करणारी लोकसंख्या जास्त असेल. यासाठी समाजातील स्त्रियांचा दर्जा उंचावणे, स्त्री-शिक्षण दिले गेले पाहिजे. स्त्री शिक्षणाचा प्रसार व प्रचार झाला पाहिजे. स्त्रियांना रोजगाराची संधी उपलब्ध करुन दिल्यास दारिद्र्य निर्मूलनाच्या दृष्टीने ते उपयुक्त ठरते.

परंतु योजनांची अंमलबजावणी योग्य प्रकारे व योग्य वेळेत होणे गरजेचे आहे. योजनेचा लाभ योग्य त्या व्यक्तींनाच मिळायला पाहिजे.

## संदर्भ ग्रंथ सूची


१) भारतीय सामाजिक समस्या, प्रा. डॉ. सुनील मायी, अंशुल प्रकाशन, नागपूर.

२) भारतातील समकालीन सामाजिक समस्या, प्रा. माणिक माने, विद्या प्रकाशन, नागपूर

३) भारतीय सामाजिक संरचना आणि सामाजिक समस्या, रा. ज. लोटे, पिंपळापुरे ॲण्ड कंपनी पब्लिशर्स, नागपूर.

४) भारतीय समाज प्रश्न आणि समस्या, प्रात्र डॉ. सुनील मायी, डायमंड पब्लिकेशन, पुणे


★★★

Smt. P.D. Patil Social Work College, College Code 225, Khadki, AKOLA



Scanned with OKEN Scanner

17/17-18

**RAJYASHASTRA PRADHYAPAK PARISHAD (VIDARBHA PRANT)**
(Reg. No. MH-651/17(NAG.)

*IN COLLABORATION WITH*

**DEPARTMENT OF POLITICAL SCIENCE**
**SITABAI ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE, AKOLA**
**ORGANIZED**

# One Day Interdisciplinary National Conference on
# Indian Democracy : Challenges and Remedies

## CERTIFICATE

This is to Certify that Prof./Dr./Mr./Ms./Mrs. एस. एन. देशमुख (संशोधक विद्यार्थी) of जगदीशप्रसाद झाबरमल टिबड़ेवाला विश्वविद्यालय झुंझुनू (राजस्थान) has participated In the Interdisciplinary National Conference on **'Indian Democracy : Challenges and Remedies'** Organized by Rajyashastra Pradhyapak Parishad (Vidarbh Prant) & Department of Political Science, Sitabai Arts, Commerce & Science College, Akola, on **30th December 2017**. He/She submitted/ Presented a paper Entitled आदिवासी भागातील कुपोषण

**Dr. Ratan V. Rathod**
Organizing Secretory
Head, Dept. of Political Science,
Sitabai Arts, Comm. & Science College,
AKOLA

**Dr. R. D. Sikchi**
Principal & Convenor
Sitabai Arts, Comm. & Science College
AKOLA

Smt. P.D. Patil Social Work College, Khadki, AKOLA — College Code 225

**Dr. Mrs. Alka Deshmukh**
Convenor & President
Rajyashastra Pradhyapak Parishad
(Vidarbha Prant)

Scanned with OKEN Scanner

❖ प्रकाशक :

मेहेरबाबा पब्लिशर्स

हसनबाग पोलिस चौकी जवळ,

हसनबाग रोड, न्यु नंदनबन, नागपूर-९

मो. ९९२३६३०३१५, ८०८७४६०४७०

Email: meherbabapublishers0616@gmail.com

समकालीन प्रश्न आणि भारतीय लोकशाही

❖ प्रथम आवृत्ती : ३० डिसेंबर २०१७

❖ © राज्यशास्त्र प्राध्यापक परिषद (विदर्भ प्रांत), नागपूर

रजि. नं.महा. ६५१/१७ (नागपूर)

❖ अक्षर जुळवणी

'हरि ओम' कॉम्प्युटर्स,

नागपूर मो. ९६७३'५५०७२०

Smt. P.D. Patil Social Work College
College Code 225
Khadki, AKOLA

❖ ISBN- 978-93-87558-03-8

₹ : ६००/-

या पुस्तकातील लेखामध्ये व्यक्त झालेली मते व मजकूर लेखकांची आहेत. त्यांच्याशी प्रकाशक, परिक्षण समिती व संपादक सहमत असतीलच असे नाही. लेखातील मजकुराची जबाबदारी सर्वस्वी लेखकांची आहे.

Scanned with OKEN Scanner

७४) भारतीय लोकशाही व करप्रणाली ४०१
डॉ. शरद सांबारे
७५) भारतीय लोकशाही वृद्धींगत करण्यासाठी प्रसार माध्यमांची भूमिका ४०६
गजानन एस. उपरीकर
७६) भारतीय लोकशाही पूढील आव्हाने व उपाय ४०९
डॉ. राजेंद्रप्रसाद टी. पटले
७७) भारतीय राजकारणातील समस्यांची मिमांसा ४१३
प्रा. मनिषा यादव
७८) आदिवासी भागातील कुपोषण ४१६
एस.एन.देशमुख
७९) धार्मिक मुलतत्त्ववाद: भारतीय लोकशाहीसमोरील प्रमुख आव्हान ४२३
प्रा. रीता धांडेकर
८०) भारतीय लोकशाही समोरील आव्हाने व उपाययोजना ४२८
डॉ. उमेश आर. धुमाळे
८१) भारतीय लोकशाही पुढील आव्हाने ४३३
डॉ. रतन व्ही. राठोड
८२) सामाजिक न्याय आणि लोकशाहीतील भारतीय महिलांसमोरील आव्हाने ४४०
प्रा. एस.आर.दामोदर
८३) पं.विष्णू दिगंबर पलुस्कारांचा राजकीय सहभाग ४४५
प्रा. नाना विठ्ठलराव भडके
८४) लोकशाही बळकटीकरणामध्ये राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांची भूमिका: एक अध्ययन ४५०
प्रा. अमोल वासुदेवराव गावंडे
८५) शेतकरी आत्महत्या : भारतीय लोकशाही समोरील एक आव्हान ४५५
प्रा. सुनिल प्रल्हाद गायगोळ
८६) राजकारणाचे गुन्हेगारीकरण ४६२
प्रा. सुनिल रू. अडगांवकर
प्रा. निलेश अ. फटींग

★★★

Smt. P.D. Patil Social Work College
College Code 225
Khadki, AKOLA

Scanned with OKEN Scanner

# आदिवासी भागातील कुपोषण

प्रा. एस.एन.देशमुख
जगदीशप्रसाद झाबरमल टिबडेवाला विश्वविद्यालय,
झुंझुन राजस्थान

**सारांश**

आपल्या देशात कुपोषण ही एक ज्वलंत समस्या आहे. कुपोषण हे सर्व वयोगटातील व्यक्तीमध्ये आढळते. परंतु बालकांमध्ये हयाचे प्रमाण फार मोठयाप्रमाणात आहे. त्यातही आदिवासींमध्ये कुपोषणाचा प्रश्न फार गंभीर स्वरूपाचा आहे. कुपोषणाला केवळ गरीबी, अन्नाची कमतरता, अन्नातील पोषक तत्वांचा अभाव हीच कारणे जबाबदार नसुन रोजगाराकरीता आदिवासींचे होणारे स्थानांतरण, रोजगाराचा अभाव, अंधश्रध्दा, हे घटकही जबाबादार आहेत. ह्या परिस्थीतीत सुधारणा करण्याच्या दृष्टीने आदिवासींच्या पोषण विषयक गरजा भागविण्यासाठी व त्यांचा कुपोषणापासुन बचाव करण्यासाठी विशेष कृती कार्यक्रम राबविण्याची आवश्यकता आहे. लोकसंख्येच्या प्रमाणात आदिवासींसाठी निधी उपलब्ध करून देणे बंधनकारक असतांनाही केवळ राज्यकर्त्यांच्या नाकर्तेपणामुळे पुरेसा निधी मिळत नाही. वैदयकीय सेवांचा अभाव दूर केला गेला पाहीजे. स्थानिक मुलींना अगदी प्राथमिक उपचाराच्या आवश्यक गोष्टीबाबत प्रशिक्षण दिले गेले पाहिजे. स्वयंसेवी संस्थाच्या मदतीने कुपोषण ही समस्या सोडविता येईल त्यामुळे स्वंयसेवी संस्थांची मदत घ्यावी. रोगराईचे वाढते प्रमाण, आजारपणात अन्नाची कमतरता यामुळे कुपोषणाची समस्या गंभीर होण्यास वेळ लागत नाही.

**प्रस्तावना**

कुपोषण म्हणजे, शरीराच्या पोषणासाठी एक किंवा अधिक अन्नघटकांच्या अभावामुळे निर्माण होणारी शारीरिक स्थिती होय. कुपोषणाचे अनेक प्रकार असून त्यातील प्रथिने तसेच उष्मांक/ऊर्जा यांच्या अभावाने होणारे कुपोषण सर्वात जास्त प्रमाणात दिसते. जीवनसत्वे आणि खनिजे यांच्या अभावानेसुध्दा कुपोषण होते. कुपोषणामुळे संसर्गजन्य रोगांविरुध्द लढण्यासाठी लागणारी प्रतिकारशक्ती सुध्दा कमी होते.



Smt. P.D. Patil Social Work College
College Code 225
Khadki, AKOLA

Scanned with OKEN Scanner

घेतात. बहुतांश आदिवासींना आरोग्य सुविधांचा फायदा होत नाहीत्त याचे कारण म्हणजे आधुनिक औषधोपचाराची भिती व वनौषधी वरील विश्वासामुळे सुध्दा आदिवासी आधुनिक आरोग्य सुविधांपासुन दुर राहतात. शासनाच्या नवसंजीवन योजने अंतर्गत गर्भवती आदिवासी महिलांना मिळणाऱ्या मातृत्व लाभ अनुदानाचा लाभ होत नाहीत. योजनेची माहीती नसने वा अधिकाऱ्यांच्या भ्रष्ट पध्दतीमुळे आदिवासींना हा लाभ मिळू शकत नाही.

## संदर्भ ग्रंथ सूची


१) बुरंगे राजेश, आदिवासी क्षेत्राचा आरोग्य दर्जा, नाथे प्रकाशन, नागपुर २०१०.

२) देवगांवकर शेलजा व देवगांवकर श.गो., आदिवासी विश्व, आनंद प्रकाशन नागपुर, २००१.

३) पाटील व्ही. बी., मानवी हक्क, के सागर प्रकाशन पुणे २००८.

४) ताटके निलम, समाजकार्य कोष, डायमंड प्रकाशन पुणे २००८.


★★★

Smt. P.D. Patil Social Work College
College Code 225
Khadki, AKOLA



Scanned with OKEN Scanner

# समकालीन प्रश्न

आणि

# भारतीय लोकशाही



Smt. P.D. Patil Social Work College
College Code
225
AKOLA

Scanned with OKEN Scanner

❖ प्रकाशक :
मेहेरबाबा पब्लिशर्स
हसनबाग पोलिस चौकी जवळ,
हसनबाग रोड, न्यु नंदनवन, नागपूर-९
मो. ९९२३६३०३१५, ८०८७४६०४७०
Email: meherbabapublishers0616@gmail.com

समकालीन प्रश्न आणि भारतीय लोकशाही

❖ प्रथम आवृत्ती : ३० डिसेंबर २०१७

❖ © राज्यशास्त्र प्राध्यापक परिषद (विदर्भ प्रांत), नागपूर
रजि. नं.महा. ६५१/१७ (नागपूर)

❖ अक्षर जुळवणी
'हरि ओम' कॉम्प्युटर्स,
नागपूर मो. ९६७३५५०७२०

❖ ISBN- 978-93-87558-03-8

Smt. P.D. Patil Social Work College
College Code 225
Kheti, AKOLA

₹ : ६००/-

या पुस्तकातील लेखामध्ये व्यक्त झालेली मते व मजकुर लेखकांची आहेत. त्यांच्याशी प्रकाशक, परिक्षण समिती व संपादक सहमत असतीलच असे नाही. लेखातील मजकुराची जबाबदारी सर्वस्वी लेखकांची आहे.

Scanned with OKEN Scanner

५९) लोकशाही शासन व्यवस्थेत प्रसारमाध्यमांची भूमिका
डॉ. शीला संजय खेडीकर
डॉ. अमर बोंद्रे ३०१
६०) राजकारणाचे गुन्हेगारीकरण: भारतीय लोकशाहीपुढील एक आव्हान
डॉ. बाळासाहेब जी. जोगदंड ३०५
६१) भ्रष्टाचार एक गंभीर समस्या
प्रा. देवेंद्रसिंग परसिंग सोळंके ३१५
६२) भ्रष्टाचार एक जागतिक समस्या
डॉ. महेंद्र भिमराव भगत ३१८
६३) भारतीय लोकशाही शासनव्यवस्थे समोरील भ्रष्टाचार: एक आव्हान
डॉ. आर.डी.इंगोले ३२९
६४) भारतीय लोकशाही आणि भ्रष्टाचार
प्रा. सुजाता भेले ३३५
६५) भ्रष्टाचार : चिंता आणि चिंतन
डॉ. बळीराम परशराम अवचार ३४२
६६) भ्रष्टाचार : एक सामाजिक अध्ययन
प्रा. स्नेहल मनिष चिमणकर (खंडारे) ३४९
६७) भ्रष्टाचार : भारतीय लोकशाही समोरील एक आव्हान
प्रा. श्रीहरी भा. सानप ३५५
६८) अर्थगैरव्यवहाराची समिक्षा....!
डॉ. पोर्णिमा मेश्राम (गणवीर) ३५९
६९) ग्रामीण भारतातील बेकारी, दारिद्र्य आणि शासकीय योजना
प्रा. कु. दिपाली श्रीराम घोगरे ३६३
७०) बेकारी एक ज्वलंत सामाजिक समस्या
प्रा. नवनाथ व्यंकट वडे ३७१
७१) दारिद्र्याची समस्या
प्रा. रावसाहेब ढोके ३७९
७२) भारतातील दारिद्र्य निर्मूलन : समस्या व उपाय
डॉ. संदीप भिमराव फाळके ३८९
७३) वस्तू व सेवा कराचे महत्त्व
डॉ. प्रसन्नजीत गवई ३९५

Smt. P.D. Patil Social Work College
College Code 225

Scanned with OKEN Scanner

# भ्रष्टाचार : चिंता आणि चिंतन

डॉ. बळीराम परसराम अवचार,
(सह. प्राध्यापक),
श्रीमती पंचफुलादेवी पाटील
समाजकार्य महाविद्यालय, खडकी, अकोला.

**प्रस्तावना**

भ्रष्टाचार ही समस्या केवळ राज्य किंवा देशापुरती मर्यादित नसून ती जागतिक समस्या आहे. भारतीय समाजजीवनामध्ये अत्यंत जटील प्रमाणात भ्रष्टाचार वाढला आहे. आपल्याला अनेक क्षेत्रामध्ये मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार वाढलेला असल्याचे दिसून येते. पण बरेच लोक या भ्रष्टाचाराविषयी काहीच प्रतिक्रिया देत नसल्यामुळे अनेक वेळा आपले सामाजिक, आर्थिक, राजकिय नुकसान होत असल्याचे दिसून येते. वास्तव पाहता भ्रष्टाचार हा मानवी समाजाला लागलेला रोग आहे असे आपल्याला म्हणावे लागेल. समाजात अनेक समस्या आढळून येतात त्यामध्ये भ्रष्टाचार ही एक मोठी समस्या समोर आल्याचे आपल्याला कळेल. आपण सहजतेने म्हणून जातो की, "भ्रष्टाचार हाच शिष्टाचार होय." त्याचे कारण भ्रष्टाचाराच्या कर्करोगाने संपूर्ण समाजाला व्यापले आहे पोखरून काढले आहे. शासनातील कोणतेही क्षेत्र त्यापासून अलिप्त नाही असे दुर्दैवाने म्हणावे लागते. अगदी शैक्षणिक न्यायदानासारखी पूर्वी पवित्र मानलेली क्षेत्र यांना देखिल या भ्रष्टाचाराला विळखा बसलेला काही प्रसंगी दिसून येतो. म्हणूनच जुना कायदा आय. पी. सी कलमे १६१ ते १६५ (अ) अपुरा पडू लागला आहे म्हणून प्रथम १९४७ चा कायदा झाला त्यात सुधारणा म्हणून नवीन कायद्यात सन १९८८ च्या कलम २ मध्ये विविध क्षेत्रांतील अधिकारी सेवक लोकसेवक म्हणून धरले गेले आणि त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करता येऊ लागली.

'भ्रष्टाचार हाच शिष्टाचार' हे रूढ म्हण बदलून 'भ्रष्टाचार हा अनाचार' असे म्हणावे लागेल. तो अत्याचार नसून अनाचारच होय. कारण अत्याचार, खून, बलात्कार हे वैयक्तीक बाब आहे. येथे तर या अनाचारामुळे सर्व समाजाची शासन व्यवस्था पोखरली जात आहे. म्हणून नविन कायद्याची व्याप्ती सर्वस्पर्शी केली आहे. जसेचे पोलिसांचे अधिकार देऊन सक्षम दिले आणि लोकसेवकांनी कर्तव्य बुद्धीने कार्य केले तर भ्रष्टाचाराला काही नियंत्रण मर्यादा राहील. संपूर्ण उच्चाटन हा केवळ स्वप्नच म्हणावे लागेल कारण गीतेत महात्म्यामध्ये सांगितल्याप्रमाणे जेव्हा जेव्हा अनाचार माजतो तेव्हा परमेश्वर अवतार धारण करतो-

''परित्राणाय साधुनां विनाशायच दुष्कृताम्।

धर्मसंस्थापनार्थाय संभवामी युगे युगे।''

चौथ्या अध्यायात असे म्हटले आहे आणि पुराणकाळी वेगवेगळ्या समाजाच्या उत्थानाकरिता, रक्षणाकरता दहा अवतार मत्स्यावतार ,कुर्मावतार , वराहवतार, नृसिंहावतार, वामनावतार, परशुरामावतार, श्रीरामावतार, श्रीकृष्णावतार, बुध्दावतार आणि कल्की अवतार आपण मानतो. कारण कायदाच सांगतो 'कायद्याचे अज्ञान क्षम्य नाही.'

माणूस जन्माने भ्रष्ट नसतो त्याला आर्थिक आणि सामाजिक व कौटुंबिक परिस्थिती व्यक्तीला भ्रष्टाचार करण्यास प्रवृत्त करते अनेक वेळा तर ईर्ष्या, अतृप्त इच्छा, हव्यास दुर्बलता, लोभ ही देखिल भ्रष्टाचाराची कारणे असल्याचे दिसून येते.

मर्यादा वाढलेल्या लोकसंख्येच्या मुलभुत गरजा आणि सर्वच स्थरावरील मागणी आणि पुरवठ्यातील तफावत जीवघेणी स्पर्धा दैनंदिन जीवनाचा गाडा हाकतांना जीवाचा झालेला कोंडमारा आणि त्यावरील उपाय म्हणजे कळत नकळत लाच देऊन-घेऊन भ्रष्टाचाराला केलेली साथ. आज देशभरात केंद्र, राज्य, तालुका, जिल्हा, ग्रामपंचायत पातळीवर जनतेला स्वत:ची कामे करून घेण्यासाठी बऱ्याच वेळा आपण लाच देतांना किंवा घेतांना बघतो एवढेच नाही तर औद्योगिक व खाजगी आस्थापनात सुध्दा देण्याघेण्याचे प्रकार चालतात. उदा. बँका,आर्थिक पतपेढ्या इत्यादी.

**भ्रष्टाचाराचा अर्थ**

खरं म्हणजे 'भ्रष्टाचार' हा विषय फार जुन्या काळापासून चर्चेत राहिला आहे. त्यामुळे भ्रष्टाचार म्हणजे काय हे पाहणे आवश्यक ठरते. भ्रष्टाचार ही संकल्पना प्रत्येक जण आपआपल्या सोयी नूसार वापरतो. भ्रष्टाचार या संकल्पनेमध्ये भ्रष्ट आणि आचार (वर्तन) असे दोन शब्द अंतर्भुत आहेत याचा अर्थ भ्रष्ट वर्तन म्हणजेच भ्रष्टाचार होय. सामान्यपणे समाजमान्य नियमांचा भंग करणारे वर्तन करणे, आपल्या पदाचा अधिकाराचा गैरवापर करणे म्हणजे भ्रष्टाचार होय. ऑक्सफर्ड शब्दकोशानुसार भ्रष्टाचार हा शब्द व्यापक असून त्यामध्ये नैतिक अध:पतन, लाचलुचपत नियमबाह्य वर्तन इ. वर्तनाचा समावेश होतो. म्हणून भ्रष्टाचार म्हणजे नेमके काय हे पाहण्यासाठी भ्रष्टाचाराच्या काही व्याख्या खालील प्रमाणे सांगता येतील

**सन्थानम आयोग१९६४,** ''एखादे शासकिया पद व सार्वजनिक जीवनातील प्रभावी पद किंवा सत्तेचा दुरूपयोग, स्वार्थी हेतूने केला जाणारा वापर म्हणजे भ्रष्टाचार होय.''

**इलियट आणि मेरील,** ''भ्रष्टाचार म्हणजे (पदावरील सत्ताधारी व्यक्तीने) प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या व्यक्तीगत फायद्यासाठी केली जाणारी कसूर होय.''

**भारतीय संविधान :** भारतीय राज्यघटनेच्या १६१ व्या कलमानुसार ''जो शासकीय (सनदी) सेवक आहे, त्याने आपल्या कायदेशीर वेतनाशिवाय दुसऱ्या व्यक्तीकडुन आपल्या कामाबद्दल मान-सन्मानाची अपेक्षा बाळगणे, इनाम (बक्षिसी) स्वीकारणे त्याचा मोबदला म्हणून संबंधित व्यक्तीसाठी अपकारक किंवा हानिकारक वर्तन करणे म्हणजे भ्रष्टाचार होय.''

Smt. P. D. Patil Social Work College
College Code 225



Scanned with OKEN Scanner

भ्रष्टाचार प्रतिबंध समिती, ''व्यापक अर्थाने, एक सार्वजनिक पद अथवा समाजात उपलब्ध असलेल्या एका विशेष दर्जाशी संलग्न शक्ती आणि प्रभावाचा अनूचित वा स्वार्थासाठी उपयोग करणे म्हणजे भ्रष्टाचार होय.''

थोडक्यात, वरील सर्व व्याख्यांचा परामर्श लक्षात घेता असे निदर्शनास येते की, कर्तव्याचे जाणिवपूर्वक उल्लंघन करून अनूचित लाभ प्राप्त करणे म्हणजे भ्रष्टाचार होय. म्हणजे केवळ स्वत:चा स्वार्थ भागविण्यासाठी लोकांकडून त्यांच्या योग्य व रास्त कामाची अगाऊ रक्कम स्विकारणे किंवा लाच घेणे होय. त्यामुळे भ्रष्टाचारामध्ये व्यक्ती सहकार्य सेवाभाव, सहकार्य यांना तिलांजली देऊन स्वत:चा स्वार्थ साधला जातो.

**भ्रष्टाचाराची कारणे**

देशामध्ये सार्वजनिक क्षेत्रासह सर्वच क्षेत्रात भ्रष्टाचार आढळतो. राजकारण, नोकरशाही, नियंत्रण व्यवस्था, क्रिडा, साहित्य इत्यादी सर्व क्षेत्रे भ्रष्टाचाराने व्यापली आहेत. त्यामुळे भ्रष्टाचाराची जी प्रमुख कारणे आहेत त्यावर लक्ष केंद्रीत करणे महत्वाचे ठरते. ती खालील प्रमाणे.

**समाजात पैशाचे वाढते महत्व**

भ्रष्टाचाराची माध्यमे आणि स्वरूप वेगवेगळ्या क्षेत्रात वेगवेगळी असली तरी त्याचे मुळाशी पैसा हाच महत्वपूर्ण घटक आहे. आज संपुर्ण समाज अर्थप्रधान झालेला आहे. मानवी भावभावनांपेक्षा पैशाला अतोनात महत्व आले आहे त्यामुळे पैसा नसेल तर नातेसंबंध देखिल व्यर्थ आहेत अशी अवस्था समाजाची आज निर्माण झाली आहे. परिणामी व्यापाऱ्याचा भ्रष्टाचार, सरकारी व खाजगी कार्यालयांमध्ये एखाद्या अधिकाऱ्या पासून ते शिपाया पर्यंतचा भ्रष्टाचार, न्यायव्यवस्थेतील भ्रष्टाचार राजकारणी लोकांचा भ्रष्टाचार अशी भ्रष्टाचाराची अनेक उदाहरणे देता येतील. ही सगळी भ्रष्टाचाराची उदाहरणे आर्थिक बाबींशी म्हणजेच पैशाशी संबंधीत आहेत.

**नैतिक मूल्यांचे अध:पतन**

समाजातील भ्रष्टाचारावचे हे एक प्रमुख कारण आहे. समाजातील नैतिकता समाजातील बहुसंख्य लोकांनी स्विकारलेल्या व्यवस्थेवरून ठरत असते. जर लोकांनी नैतिकतेची व्याख्याच बदलली तर भ्रष्टाचार समाजमान्य होऊन जातो. सगळेच पैसे देतात म्हणून आपण दिल्याशिवाय पर्याय नाही. अशातऱ्हेचे समर्थन देखील लोकांच्या माध्यमातून केले जाते. असे मानले जाते की, समाजातील अभौतिक संस्कृती किंवा नैतिक नितिमूल्ये सहसा बदलत नाही. याउलट असे म्हणता येते की, आज अभौतिक संस्कृती देखील वेगाने बदलत चालली आहे. ऑगबर्नचा सांस्कृतिक पाश्चायनाचा सिध्दांत देखील थिटा पडावा इतक्या वेगाने आज भौतिक बदलांबरोबर अभौतिक बदल होताना दिसतात.

ज्या नैतिक मूल्यांचे आचरण करून जीवनात कोणतेही समाधान मिळत नाही उलट अनेक दु:खांनाच सामोरे जावे लागते हयाची खात्री लोकांना पटल्यानंतर लोक नैतिक मूल्यांपेक्षा अनैतिक मूल्यांनाच जास्त महत्व देतात व नैतिक तत्वज्ञान हे पुस्तकापुरते सीमीत राहते असे दिसून येईल.



Smt. P.D. Patil Social Work College
College Code 225
Khadki, AKOLA

Scanned with OKEN Scanner

### अपुरे वेतन

काही क्षेत्रातील कर्मचाऱ्यांना मिळणारे वेतन अपुरे असते. उलट त्यांना वेतनाच्या मानाने मोठ्या जबाबदाऱ्या व धोके यांना सामोरे जावे लागते. उदा. पोलिस खाते, जंगल खाते वगैरे. त्यांन त्यांच्या जबाबदाऱ्यांच्या मानाने भत्ते, निवासस्थानाच्या सोई वगैरे फारसे उपलब्ध होत नाही. त्यात वाढती महागाई व वाढता घरखर्च याला तोंड देण्यासाठी त्याला भ्रष्टाचाराचा मार्ग हा उपयुक्त वाटतो. विशेषतः अल्प वेतन असणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या हाती अधिक अधिकार, सत्ता असेल तर त्यांच्याकडून भ्रष्टाचार होण्याची शक्यता अधिक असते.

### लोकशाही निवडणुका

लोकशाही शासनयंत्रणेचा आपण स्वीकार केला आहे. पण लोकशाहीचा कारभार हा खर्चीक असतो. मुळातच ज्यांना ग्रामपंचायती, जिल्हापरिषद, नगरपालिका, विधानसभा, लोकसभेवर लोकप्रतिनिधी म्हणून निवडून जायचे असते, त्यांना खरेतर त्या स्थानावरून सत्तेचा, अधिकाराचा दुरूपयोग करून पैसाच गोळा करायचा असतो. एवढेच नव्हे तर या पैशाच्या बळांवर पुन्हा निवडणुका लढवून त्या त्यांना जिंकायच्या असतात. साहजिकच निवडुन येण्यासाठी भारतातील बहुसंख्यांकांचे अज्ञान, जातिव्यवस्था, दारिद्रय इत्यादींचा फायदा घेवुन ते मते विकत घेतात. त्यासाठी ते भ्रष्टाचारच करतात. हा त्यांनी खर्च केलेला पैसा एकप्रकारे त्यांच्या दृष्टीने गुंतवणूक असते. तेव्हा तो अनेक पटीने भरून काढणे यासाठी निवडुन गेल्यावर मिळालेल्या सत्तेचा गैरवापर करतात.

### राजकीय नेत्यांना अभय

मंत्रीपदावरील व्यक्तीवर भ्रष्टाचाराचा आरोप ठेवून त्याची चौकशी करून त्यावेर खटला भरणे अत्यंत किचकट काम आहे. त्यामुळे त्यांना या गोष्टीचा आश्रय मिळतो व त्यांन मोकाटपणे वागता येते. भ्रष्टाचार करता येतो. त्याचा कित्ता इतरजण गिरवून मोठे होण्यासाठी धडपडतात.

सत्ताधारी पक्षाला तर आपल्या पक्षातील सत्ताधाऱ्यांची वागणूक चुकीची व गैर आहे हे माहीत असून देखील बहुमताच्या जोरावर त्यांच्या चुकांवर पांघरूण घालता येते. खुद्द पंडित जवाहरलाल नेहरूंनी कृष्ण मेनन संरक्षण मंत्री असताना त्यांनी केलेल्या घोटाळयाबाबत अशाच दृष्टिकोणाचा वापर केला होता. आता तर कित्येकदा सत्ताधारी पक्ष व त्यांचे अनुयायी तर त्यांना मिळत असलेल्या अभयांचा प्रचंड वापर करून भ्रष्टाचार करीत असतांना दिसून येतात.

### प्रशासन व नोकरशाही

राजकीय क्षेत्र व प्रशासन याचा निकटचा संबंध येत असतो. भारतासारख्या विशाल देशाचा कारभार तोही लोकशाही पध्दतीने चालवण्यासाठी जे प्रशासकीय व्यवस्थेचे जाळे सर्व देशभर पसरले आहे त्यातून दिवसेदिवस नोकरशाहीचा व्याप वाढत चालला आहे. यातील अनेक उणिवांमुळे प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी सचिवापासून ते तलाठयांना भ्रष्टाचारास वाव मिळाला आहे. भ्रष्ट राजकीय नेते व भ्रष्ट प्रशासकीय अधिकारी-कर्मचारी हे संगनमताने एखाद्या प्रकल्पासाठी, योजनेसाठीचा पैसा पध्दतशीररित्या हडप करतात. तेरी भी चुप व मेरी भी चुप अशा [illegible] एकमेकांचे हितसंबंध सांभाळतात.



College Code 225

सामाजिक प्रतिष्ठा।

भ्रष्टाचार केल्यामुळे अधिक पैसा मिळतो व अधिक पैसा मिळाल्यानंतर सामाजिक प्रतिष्ठा प्राप्त होते असे सरळसरळ सूत्र आज निर्माण झालेले आहे. परिणामी जर एखादी व्यक्ती भ्रष्टाचार करीत नसेल व नैतिक मुल्यांचे समर्थन करीत असेल तर ती चेष्टेचा विषय बनते. परिणामी जे लोक भ्रष्टाचाराच्या चक्रात अडकलेले नाहीत ते देखील भ्रष्टाचार करण्यास सुरूवात करतात. पूर्वी ज्या व्यवसायाला अधिक नैतिक प्रतिष्ठा होती त्या शिक्षणक्षेत्रात देखील आज लोक मोठया प्रमाणावर भ्रष्टाचार करताना आणि भ्रष्टाचाराचे समर्थन करताना दिसून येतात.

अंमलबजावणीची यंत्रणाच भ्रष्ट असणे

भ्रष्टाचाराला प्रोत्साहन मिळण्याचे हे एक महत्वाचे कारण आहे की, ज्या माध्यमांनी भ्रष्टाचार रोखण्यासाठी मदत करणे अपेक्षित आहे ती माध्यमाचे जर दुर्बल ठरली तर किंवा ती माध्यमेच भ्रष्टाचारी झाली तर भ्रष्टाचाराला प्रोत्साहन मिळते. सामान्य माणसांना संरक्षण राहत नाही. कुठे दादफिर्याद मागावी हे समजत नाही. तसेच कायद्यात अनेक पळवाटा देखील निर्माण होतात. जेव्हा एखादा कायदा समाजात नव्याने अस्तित्वात येतो तेव्हा तो कायदा कसा पाळला जाणार नाही याविषयीच्या पळवाटा देखील समाजामध्ये त्यावेळी अस्तित्वात येताना दिसून येतात. लोकांना जेव्हा अंमलबजावणीच्या यंत्रणांची भीती वाटत नाही त्यावेळी भ्रष्टाचार वाढत चाललेला दिसून येतो.

भ्रष्टाचाराचे परिणाम

- समाजाची नितीमत्ता खालावते.
- असामाजिक वागणुकीला समाजात प्रतिष्ठा मिळते.
- कायद्याच्या अंमलबजावणीची यंत्रणा कमकुवत होते.
- सामान्य लोकांना भ्रष्टाचाराच्या जाळयात ओढल्यामुळे समाजात असामाजिक तत्वे शिरतात.
- समाजात केवळ जीवन जगण्याचा आधार आर्थिक घटकच होतो.
- अनेकांवर अन्याय होतो.
- भ्रष्टाचाराचे समर्थन केले जाते.
- लोकांना त्यांच्या मूलभूत अधिकारांपासून विन्मुख केले जाते.

उपाययोजना

भ्रष्टाचाराविरोधी जनमत

मुळातच भारतातील बहुसंख्य जनता अज्ञानी, दारिद्री व शोषीक आहे. पण त्यांच्यात त्यांच्या हक्काविषयीची व भ्रष्टाचाराविरोधी निषेध उचलण्यासाठी त्यांच्यात जागृती आणणे आवश्यक आहे. यासाठी वृत्तपत्रांनी लोकशिक्षणाचे कार्य करतानाच कोठे, कोण भ्रष्टाचार करत आहे याची साद्यंत हकिकत मिळवू ती जनतेसमोर आणली पाहिजे. भ्रष्टाचारविरोधी लोकांच्यात जागृती आणण्याचे कार्य वर्तमानपत्रांनी समर्थपणे करण्यानेच लोकशाहीचे संरक्षण शक्य होते.

Smt. P.D. Patil Social Work College, College Code 225, Sokhandi, AKOLA

### विशेष पोलिस कक्ष

लाचलुचपत व भ्रष्टाचाराला आळा घालण्यासाठी १९४१ मध्ये ब्रिटिश शासनाने हा विशेष पोलिस कक्ष स्थापन केला. भ्रष्टाचाराची प्रकरणे व त्या संबंधित सनदी सेवकांची चौकशी करणे व त्यांना दोषी असतील तर शिक्षा करणे हे कार्य या कक्षाचे होते.

### विभागांतर्गत दक्षता यंत्रणा

१९५५ साली प्रत्येक शासकीय विभागांतर्गत भ्रष्टाचार रोखण्यासाठी ही दक्षता यंत्रणा निर्माण करण्यात आली. त्या विभागाचा प्रमुख आणि सचिव अधिकारी यांच्यावर ही यंत्रणा राबवण्याची जबाबदारी सोपवण्यात आली.

### केंद्रीय सतर्कता आयोग

संथानम समितीने केलेल्या शिफारशींनुसार १९६४ साली शासनाने केंद्रीय सतर्कता आयोगाची स्थापना केली. या आयोगाची निर्मिती राष्ट्रपतीकडून होते व त्याची मुदत ६ वर्षे असते. या सतर्कता आयोगाचे काम केंद्राप्रमाणे राज्य, जिल्हा पातळीवर चालते. या आयोगाने सनदी सेवेतील अधिकाऱ्यांवर भ्रष्टाचाराचा आरोप घेतला गेला व त्याने भ्रष्टाचार केला असला तर त्याची चौकशी करणे. जनतेने भ्रष्टाचार, लाचलुचपत या बाबत केलेल्या तक्रारींची चौकशी करणे. भ्रष्टाचार होणार नाही याबाबत प्रतिबंधक कार्य करणे, प्रशासकीय कार्यात समन्वयता साधणे. प्रशासकीय कार्यपध्दतीत सुधारणाबाबत शिफारशी करण्यावर भर दिला आहे.

### केंद्रीय अन्वेषण विभाग

१९६३ साली केंद्रीय अन्वेषण विभाग म्हणजे सी.बी.आय. स्थापन करण्यात आला आणि विशेष पोलिस आस्थापना हा विभाग सी.बी.आय. चा एक भाग मानण्यात येवु लागला. महत्वाच्या गुन्ह्याबरोबरच राज्यपातळीवरील सेवक वर्गाकडून होणाऱ्या भ्रष्टाचाराची सार्वजनिक उद्योगातील भ्रष्टाचाराची चौकशी सी.बी.आय. कडे सोपवली जाते. सी.बी.आय. केंद्रीय सतर्कता आयोगाच्या नियमानुसार काम करते. परंतु पुर्वीप्रमाणे सी.बी.आय. ला याबाबत मिळणारे स्वातंत्र्य मर्यादित झाले आहे.

### लोकपाल व लोकायुक्त विधेयक

१९६६ साली प्रशासकीय सुधार आयोगाने भ्रष्टाचाराच्या निर्मूलनार्थ राज्याच्या स्तरावर लोकायुक्ताची व केंद्रीय स्तरावर लोकपालाची नियुक्ती करण्यात यावी अशी सूचना केली. त्यानुसार आतापर्यंत १० राज्यात लोकायुक्त ही संस्था स्थापन करण्यात आली. या संदर्भात कायदा करून लोकायुक्तांच्या नेमणुका करण्यात आलेल्या आहेत. राज्यातील मंत्री, सचिव अशा उच्चस्तरीय लोकप्रतिनिधी, अधिकाऱ्यांवर भ्रष्टाचाराचे आरोप झाले असता लोकायुक्त या अधिकाऱ्यांनी निर्भीडपणे, निष्पक्षपातीपणे चौकशी करावी. अशाच कार्यासाठी केंद्रीय स्तरावर लोकपालाने कार्य करावे अशी सूचना केली गेली. पण अद्याप याबाबतचे 'लोकपाल विधेयक' संसदेतच अडकून पडले आहे. ते संमत झालेले नाही. हे विधेयक संसदेत मंजुर होण्यासाठी प्रसिध्द समाज सेवक श्री. अण्णा हजारे यांनी दिल्लीतील जंतरमंतर वर उपोषण करून देशव्यापी आंदोलन केले. या आंदोलनाची शासनाला दखल घ्यावी लागली.



Smt. P.D. Patil Social Work College
College Code
225

Scanned with OKEN Scanner

## भ्रष्टाचारविरोधी आंदोलन

या आधी भ्रष्टाचाराच्या निर्मूलनार्थ ज्या विविध उपाययोजना आपण पाहिल्या त्या कागदावर जरी प्रभावी वाटल्या तरी प्रत्यक्षात त्यांना तसे यश आलेले नाही. याची अनेक कारणे आहेत. त्यामुळेच या समस्येच्या निर्मूलनार्थ जन आंदोलनाचा काही विचार मांडताना खुद्द जयप्रकाश नारायण यांनी १९७४ साली जे भ्रष्टाचारविरोधी आंदोलन उभे केले ते सत्तांतर घडवून आणण्याइतपत यशस्वी ठरले. पण हे यश अल्पकालीनच ठरले. थोर समाजसेवक श्री. अण्णा हजारे यांनी लोकजागृतीबरोबर शासनाकडे अधिकाऱ्यांनी धाव घेवुन प्रशासनातील भ्रष्टाचारविरोधी, दंडात्मक कारवाईची मागणी केली होती. एवढेच नव्हे तर गावोगाव भ्रष्टाचारविरोधी सक्रिय लढा दिला पाहिजे असे ते प्रभावीपणे सांगतात.

## सार्वजनिक व्यवहार जाणुन घेण्याचा हक्क

भ्रष्टाचाराचा अन्याय सहन करणे म्हणजे भ्रष्टाचाराला चालना देण्यासारखे आहे. त्यामुळे आपला हक्क व जाणिवांविषयी जागरूक असणाऱ्यांनी भ्रष्टाचाराचा प्रतिकार केला पाहिजे. सार्वजनिक कामासाठी किती पैसा उपलब्ध होतो व किती खर्च होतो हे जाणून घेण्याचा अधिकार जनतेला आहे. यावर बोट ठेवून राजस्थानच्या बेवर या गावच्या नागरिकांनी संबंधित अधिकाऱ्यांची कागदपत्रे तपासायला मागितली. यामुळे भ्रष्टाचाराच्या मुळापर्यंत जावून त्याचे निर्मूलन करता येईल असे त्यांना वाटते. या संदर्भात 'मजदूर किसान शक्ती संघटना' चे कार्य महत्वाचे आहे. या संघटनेने 'जन सुनवाई' म्हणजे लोकांची गाऱ्हांनी ऐकण्याचे चार जिल्हयात कार्यक्रम आयोजित केले. यातून स्थानीक पातळीवर होत असलेली व झालेली अनेक भ्रष्टाचाराची प्रकरणे बाहेर आली आहेत.

### संदर्भ ग्रंथ सूची


१) डॉ. प्रदिप आगलावे, 'आधुनिक भारतातील सामाजिक समस्या', विद्या प्रकाशन, नागपूर.

२) डॉ. सुनिल मायी, 'भारतीय सामाजिक समस्या', अंशुल पब्लीकेशन, नागपूर.

३) प्रा.वाय.ए. कोन्डेकर, ''भारतातील आजच्या सामाजिक समस्या'', फडके प्रकाशन, पूणे.

4) www.essaysinhindi.com

5) https://hindividya.com

6) www.deepawali.co.in.


Smt. P.D. Patil Social Work College, Khadki, AKOLA, College Code 225

★★★

Scanned with OKEN Scanner

RAJYASHASTRA PRADHYAPAK PARISHAD (VIDARBHA PRANT)

*IN COLLABORATION WITH*

DEPARTMENT OF POLITICAL SCIENCE

SITABAI ARTS, COMMERCE & SCIENCE COLLEGE, AKOLA

ORGANIZED

One Day Interdisciplinary National Conference on

# Indian Democracy : Challenges and Remedies

## CERTIFICATE

This is to Certify that Prof./Dr./Mr./Ms./Mrs. प्रा. नवनाथ व्यंकट वडे. of श्रीमती पंचफुलादेवी पाटील समाजकार्य महाविद्यालय, खडकी, अकोला. has participated In the Interdisciplinary National Conference on **'Indian Democracy : Challenges and Remedies'** Organized by Rajyashastra Pradhyapak Parishad (Vidarbh Prant) & Department of Political Science, Sitabai Arts, Commerce & Science College, Akola, on **30th December 2017.** He/She submitted/ Presented a paper Entitled बेकारी एक ज्वलंत सामाजिक समस्या.

Smt. P.D. Patil Social Work College, Khadki, AKOLA — College Code 225

| Dr. Ratan V. Rathod | Dr. R. D. Sikchi | Dr. Mrs. Alka Deshmukh |
|---|---|---|
| Organizing Secretory | Principal & Convenor | Convenor & President |
| Head, Dept. of Political Science, | Sitabai Arts, Comm. & Science College, | Rajyashastra Pradhyapak Parishad |
| Sitabai Arts, Comm. & Science College, | AKOLA | (Vidarbha Prant) |
| AKOLA | | |

Scanned with OKEN Scanner

# बेकारी एक ज्वलंत सामाजिक समस्या

प्रा. मन्मथ वेंकट बंडे,
श्रीमती पंचफुलादेवी पाटील समाजकार्य महाविद्यालय,
खडकी बु. अकोला

आज बेकारीच्या समस्येने संपूर्ण भारतीय समाज विस्कळीत झाला आहे. बेकारी हे आधुनिक समाज जीवनाचे अविभाज्य अंग झाले आहे. बेकारी या सामाजिक समस्येची तीव्रता दिवसेंदिवस अधिकाधिक वाढतच आहे.

आज आपण अधूनमधून वृत्तपत्रातून बातम्या वाचतो की, कार्यालयीन शिपायाच्या एकूण १०० जागांसाठी ६५०० अर्ज आले. त्यातील अर्ज केलेले अनेक उमेदवार एम.ए., बी.एड., एम.फिल., डी.एड अशा पदव्या संपादन केलेले आहेत. यातूनच भारतातील बेकारीच्या संदर्भातील चित्र स्पष्ट दिसून येते. बेकारी या सामाजिक समस्येचा समीक्षात्मक दृष्टीकोनातून अभ्यास केल्यानंतर असे दिसून येते की, ज्या प्रमाणात भारतात लोकसंख्येची वाढ झाली, त्या प्रमाणात देशात रोजगार निर्मिती झाली नाही. त्यामुळे बेकारीच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत गेली.

खऱ्या अर्थाने भारतामध्ये प्रचंड मोठ्या प्रमाणात बेकारी वाढण्याचे कारण म्हणजे येथील शिक्षण प्रणाली, कृषी विभाग आणि रोजगार निर्मिती विभाग यांची अकार्यक्षमता होय. अर्थशास्त्रज्ञ डॉ. वि. म. दांडेकर यांनी बेकारी व दारिद्र्य या प्रश्नांच्या संदर्भात चर्चा करतांना असे मत प्रतिपादन केले आहे. त्यांच्या मते लोकसंख्या दरसाल सव्वादोन टक्के वेगाने वाढली तर आर्थिक विकासाचा वेग कमीत कमी दरसाल पाच सव्वापाच टक्के असायला पाहिजे.

'बेकारी' या शब्दाचा शास्त्रीय दृष्टीकोणातून अर्थ पाहिल्यास तो असा करता येईल, ज्या सुदृढ व्यक्तींची काम करण्याची इच्छा आहे. परंतु त्यांना कोणतेही काम उपलब्ध नाही. अशा व्यक्तींचा अंतर्भाव 'बेकारी' या संकल्पनेत करता येईल. त्यामुळे आजारी, शारिरीक व मानसिक व्यंग असणारी व्यक्ती बेकार म्हणता येणार नाही. त्यांना नोकरी व रोजगार देण्यास अपात्र असे म्हणतात.



Smt. P.D. Patil Social Work College
College Code 225
Khadki, AKOLA
Scanned with CamScanner
Scanned with OKEN Scanner

प्रा. दत्ता भगत यांनी आपल्या मराठी साहित्य लेखनात भारतामध्ये निर्माण होणाऱ्या वि. सामाजिक प्रश्नावर असे उद्गार काढलेले आहे.

हा देश म्हणजे प्रश्नांचा चक्रव्युह आहे
ज्यांनी त्याला स्पर्श केला ते महात्मे झाले,
महात्म्यांचे पुतळे झाले, प्रश्न तसेच राहिले.

भारतामध्ये निर्माण होणारी बेकारी अनेक प्रकारातून निर्माण होते. बेकारी निर्माण होण्याचे अनेक कारणे आहेत. या बेकारीचे दुष्परिणाम व्यक्ती, कुटुंब व समाज जीवनावर होतात. तसेच समाज अस्थिर व दिशाहिन होत आहे.

**बेकारीचा अर्थ व व्याख्या**

**गिलिन आणि गिलीन,** "जेव्हा एखादी धडधाकट व्यक्ती आपल्या व कुटुंबाच्या चरितार्थासाठी निर्वाधये साधन म्हणून अर्थार्जन करु शकत नाही त्या व्यक्तीस बेकार म्हणतात."

**डी. मेलो,** "एखादी व्यक्ती तिची इच्छा असताना सुध्दा वेतन मिळणारे काम प्राप्त न होण्याच्या स्थितीत आहे तिला बेकार असे म्हणतात."

**केअर चाईल्ड,** "सर्वसामान्य स्थितीत तसेच सामान्य वेतनावर व्यक्तीस बळजबरीने आणि इच्छा नसतांना वेतन देय कामापासून वेगळे करण्याच्या स्थितीस बेकारी म्हणतात."

**बेकारीचे प्रकार**

बेकारीचे विविध प्रकार पडतात, अयोग्य वेतन, भौगोलिक परिस्थिती व रचना अशा विविध बेकारीच्या प्रकारांचा आपण विचार करणार आहोत.

**चक्रीय बेकारी**

उद्योगधंद्यामध्ये जेव्हा आर्थिक मंदिची लाट निर्माण होते. तेव्हा चक्रीय बेकारी निर्माण होते. भांडवलशाही अर्थव्यवस्था असलेल्या प्रत्येक देशामध्ये तेजी आणि मंदीचे व्यवसाय चक्र सुरुच असते. यातून चक्रीय बेकारी निर्माण होते. ही बेकारी विशिष्ट काळाच्या अंतराने व चक्रीय स्वरुपाच्या गतीने येते. म्हणून यास चक्रीय बेकारी असे म्हणतात.

**तांत्रिक बेकारी**

नवनविन स्वयंचलीत शास्त्रीय शोधामुळे तांत्रिक बेकारी निर्माण होते. कारखानदाराने उत्पादन निर्मितीसाठी नवनविन स्वयंचलीत यंत्राचा वापर केल्यामुळे उत्पादनाच्या कार्यात जाणवणारी श्रमाची आवश्यकता कमी कमी होत जाते व त्यामुळे अनेक मजुर, कामगार बेकार होतात. कारखानदाराने उत्पादन निर्मितीसाठी नवनविन स्वयंचलीत तंत्रांचा वापर केल्यामुळे निर्माण होणाऱ्या परिस्थितीला 'तांत्रिक बेकारी' असे म्हणतात.

**संघर्षात्मक बेकारी**

मजुरांची मागणी व मजुरांचा पुरवठा यामध्ये संतुलन निर्माण झाल्यामुळे निर्माण होणाऱ्या बेकारीला 'संघर्षात्मक बेकारी' असे म्हणतात. मजुर आणि मालक यांचे निर्माण होणारे कलह, गरजु कामगारांना



P.D. Patil Social Work College
College Code 225

Scanned with OKEN Scanner

कामाची माहिती वेळेवर व्यवस्थित माहित न होणे, कामगारामधील गतिशिलतेचा अभाव अशा अनेक बाबीमुळे मागणी व पुरवठा यामध्ये योग्य संतुलन राहत नाही. याचा परिणाम संघर्षात्मक बेकारी निर्माण होते.

**हंगामी बेकारी**

विशिष्ट हंगामाचा कालावधी संपल्यानंतर ज्या कामगारांच्या हाताचे काम संपल्यानंतर जे कामगार बेकार होतात त्यास 'हंगामी बेकारी' असे म्हणतात. उदा. ऊस तोड कामगार, खरीप पिक कामगार, शेतकरी कामगार, अशा प्रकारे हंगामी बेकारीचे उदाहरण देत येतील.

**रचनात्मक बेकारी**

देशाच्या आर्थिक व्यवस्थेच्या रचनामध्ये मुलभूत बदलाच्या परिणामामुळे निर्माण झालेल्या बेकारीस 'रचनात्मक बेकारी' असे म्हणतात. अशा वेळेस काही उद्योगांचा ऱ्हास होतो. तर काही उद्योगांचा उदय होतो. यातूनच अनेक कामगार बेकार होतात. शेतीच्या यांत्रिकीकरण रचनात्मक बेकारीचेच उदाहरण आहे. कंत्राटी पध्दतीचे कामगार.

**अर्ध बेकारी**

प्रत्येक व्यक्तीला तिच्या पात्रतेप्रमाणे काम मिळणे आवश्यक असते. परंतु अनेक वेळा व्यक्तीला तिच्या पात्रतेपेक्षा कमी दर्जाचे काम मिळते याची खंत व्यक्तीला सतत वाटत असते. पात्रतेप्रमाणे काम न मिळाल्यास अशा व्यक्तींना 'अर्ध बेकारी' असे म्हटले जात. उदा. एम.ए., बी.एड्, झालेल्या व्यक्तीला शिपायाची नोकरी पत्करावी लागली, कुटुंबातील शेतीवर काम करणाऱ्या अनेक व्यक्ती, तसेच काही कामगारांना पूर्ण वेळ काम भेटत नाही. वरील सर्व कामगारांचा समावेश अर्ध बेकारीमध्ये होतो. प्रत्येक व्यक्तीला आठवड्यातून ४४ ते ४८ तास काम मिळणे अपेक्षित असते. परंतु प्रत्यक्षातील त्यांना २२, २४, ३० तास काम मिळते, उरलेला वेळ बेकारीत घालवावा लागतो.

**छुपी बेकारी**

छुपी बेकारी व्यक्तीच्या तसेच समाजाच्या पण लक्षात येत नाही. या प्रकारात प्रत्यक्ष व्यक्ती जरी काम करतांना दिसत असला तरी त्याच्या कामामुळे प्रत्यक्ष उत्पादनात वाढ झाल्याचे दिसत नाही. दुसऱ्या शब्दात बोलायचे झाल्यास असे म्हणता येईल की, त्या व्यक्तीमुळे ना नफा ना तोटा ही परिस्थिती निर्माण होते. म्हणून यास छुपी बेकारी असे म्हणतात. सर्वसाधारणत: मोठे पारंपारिक व्यवसाय करणाऱ्या कुटुंबातून या प्रकारची बेकारी आढळते. उदा. शेती, विणकाम, दुकानदार, उद्योजक अशा ठिकाणी छुपी बेकारी आढळून येते.

**अदृश्य बेकारी**

जेव्हा व्यक्तीला तिच्या लायकीपेक्षा कमी दर्जाचे काम उपलब्ध असते. तेव्हा त्या बेकारीला अदृश्य बेकारी असे म्हणतात. उदा. एम.ए. झालेल्या व्यक्तीला शिपायाची नोकरी पत्करावी लागते.

**दृश्य बेकारी**

जेहा व्यक्तीला तिचा उदरनिर्वाह करण्यासाठी तिच्या हाताला अजिबात काम नसते, तेव्हा निर्माण होणाऱ्या बेकारीला दृश्य बेकारी असे म्हणतात.



Smt. P.J. Patil Social Work College
College Code 225
Khadki, AKOLA

Scanned with OKEN Scanner

**बेकारीच कारणे**

आपल्या भारत देशामध्ये बेकारीचे अनेक कारणे दिसून येतात, त्यापैकी काही सामाजिक कारणांचा विचार आपण या ठिकाणी करणार आहोत.

**लोकसंख्या वृध्दी**

भारताचा लोकसंख्या वाढीचा वृध्दीदर रोजगार निर्मितीपेक्षा जास्त आहे. विशेषत: १९५१ पासून सातत्याने लोकसंख्येत वाढ होत आहे. लोकसंख्या वाढीमुळे काम करणाऱ्या गटातील संख्या वाढत आहे. त्याप्रमाणात रोजगार निर्मिती होत नाही. म्हणजे कामाची मागणी जास्त आणि कामाची उपलब्धता कमी झाली. या असंतुलनामुळे बेकारीची समस्या तीव्र झालेली दिसते. त्यामुळे भारताची लोकसंख्या झपाट्याने वाढते आहे. त्यामुळे दरवर्षी भारतामधील बेकारीचा प्रश्न अधिकाधिक उग्र बनतो आहे.

**विकासाची मंदगती**

भारत देशाच्या निती आयोगाच्या आर्थिक कार्यक्रमाद्वारे वेगवेगळ्या क्षेत्रात मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करुन नविन नोकऱ्या उपलब्ध करुन दिल्या जातात. परंतु मागणी आणि पुरवठा यामध्ये संतुलन होत नाही. त्यामुळे बेकारांच्या संख्येत दिवसेंदिवस वाढ होत आहे. देशातील विकासाचा वेग मंद असल्यामुळे किंवा अपेक्षेपेक्षा कमी असल्यामुळे सर्व बेरोजगारांच्या हाताला काम देणे शक्य झालेले नाही.

**मागासलेला शेती व्यवसाय**

आज ही भारतातील शेती ही निसर्गावर अवलंबून आहे व हंगामानुसार पारंपारिक पध्दतीने ठरावित पिके घेतली जातात. म्हणजेच आजही पारंपारिक पध्दतीने केली जात असलेली शेती आणि शेतीवर अवलंबून असणाऱ्यांची संख्या मोठी आहे. यामुळे शेती व्यवसायात अनेकांना रोजगार मिळत नाही.

**ग्रामीण उद्योगांचा ऱ्हास**

भारतात ग्रामीण क्षेत्रात गृहउद्योगातून वेगवेगळ्या वस्तुंची निर्मिती करुन कुटुंबाचा उदरनिर्वाह भागविला जात होता. परंतु आधुनिक काळात अनेक वस्तुंचे उत्पादन यांत्रिकी पध्दतीच्या साहायाने होत असल्यामुळे, या वस्तु कमी खर्चात निर्माण करता येतात. यंत्राच्या साहायाने निर्माण होणाऱ्या वस्तुंच्या स्पर्धेत ग्रामोद्योगातील वस्तू टिकाव धरु शकत नाहीत. त्यामुळे ग्रामीण क्षेत्रातील अनेक गृहउद्योग बंद पडले. त्यामुळे लोकांना जीवन जगण्याची पारंपारिक साधने राहिली नाहीत. यंत्रावर काम करण्याची कौशल्ये नाहीत. अशा प्रकारची व्यवस्था निर्माण झाल्यामुळे अनेक कामगारांवर बेकारीची वेळ आली.

**मजुरांचा वाढता पुरवठा**

मागणी आणि पुरवठा समान असेल तर बेकारीचा प्रश्न निर्माण होणार नाही. परंतु कामगारांची कामाची मागणी आणि पुरवठा यांच्यामध्ये असमतोल निर्माण झाला, तर अनेकांवर बेकार राहण्याची वेळ येते. आज भारतामध्ये पुरवठ्याच्या तुलनेत मागणी खूपच जास्त आहे.

**सदोष शिक्षण प्रणाली**

भारतातील सदोष शिक्षण पध्दती हे भारतातील बेकारीचे प्रमुख कारण आहे. कारण शिक्षणातून केवळ कारकून निर्माण केले जातात. आजची शिक्षण प्रणाली ही रोजगारभिमुख नाही. त्याला व्यवहाराची



Smt. P.D. Patil Social Work College
College Code
225

Scanned with OKEN Scanner

ओढ नाही. त्यांच्या अंगी स्वतःच्या पायावर उभे राहण्याची कुवत येत नाही. पदवी व पदविका धारक तरुण बौद्धिक कामाला महत्त्व देतो. शारीरिक कष्टाच्या कामाला महत्त्व देत नाही. त्यांना विविध प्रकारच्या नोकऱ्यांवर अवलंबून रहावे लागते. अशा प्रकारच्या नोकऱ्यांचे प्रमाण मर्यादित असते. त्यामुळे अनेक सुशिक्षित बेरोजगारांवर बेकार राहण्याची वेळ येते.

**तांत्रिक व व्यावसायिक शिक्षण प्रणालीचा अभाव**

भारतातील शिक्षण प्रणाली ही पारंपारिक प्रकारची शिक्षण प्रणाली आहे. या शिक्षण पद्धतीतून केवळ कारकुनी व्यक्तीच निर्माण होत आहेत. व्यवहारीक व व्यवसायाभिमुख ज्ञान या पद्धतीतून प्राप्त होत नाही. त्यामुळे बेकारीच्या संख्येत दिवसेंदिवस वाढच होत आहे.

**आर्थिक मंदी**

देशात आर्थिक मंदीची लाट आली म्हणजे उत्पादनांचा साठा मोठ्या प्रमाणात जमा झालेला असतो. कारण उत्पादनाची मागणी कमी होते. साहजिकच उत्पादनाच्या किमती कमी होतात. अशा वेळेस कारखानदारांचे खुप मोठे नुकसान होते. अशा वेळी नविन रोजगारांची निर्मिती होत नाही. या उलट काम करणाऱ्या श्रमिकांना कामावरून कमी केले जाते.

**आळस**

रोजगार शोधणे ही प्रक्रिया आहे. यामध्ये वृत्तपत्र वाचणे, जाहिराती मिळविणे, अर्ज करणे, बायोडाटा तयार करणे, ऑनलाईन अर्ज करणे, परिक्षा देणे, मुलाखत देणे, या प्रक्रियांचा समावेश होतो. तरुण-तरुणी आळस व कामचुकारपणा करतात. परिणामी अशा व्यक्तींना रोजगाराची संधी मिळत नाही. या उलट सतत धडपड करणाऱ्या व्यक्तीला रोजगार मिळतो.

**इतर कारणे**

* भौगोलिक गतीशिलतेचा अभाव
* अधिक वेतनाची मागणी
* सामाजिक कारण
* वैयक्तिक कारण

**बेकारीचे दुष्परिणाम**

**प्राथमिक गरजांवर परिणाम**

बेकारीचा सर्वात मोठा दुष्परिणाम म्हणजे बेकार व्यक्ती स्वतःच्या आणि तिच्यावर अवलंबून असणाऱ्या व्यक्तींच्या प्राथमिक गरजांची पूर्तता करण्यास असमर्थ ठरते. याचा परिणाम असा होतो की, अन्न, वस्त्र, निवारा या मुलभूत गरजांची पूर्तता न झाल्यामुळे आरोग्य व इतर समस्यांना सामोरे जावे लागते.

**मानसिक दडपण**

बेकार व्यक्ती सतत मानसिक प्रकारच्या दडपणाखाली वावरत असते. आपण आपल्या कुटुंबाचे पालन करण्यास असमर्थ आहोत ही जाणीव बेकाराला अपार मानसिक त्रास देते. यातून त्या बेकार व्यक्तीला मानसिक विमुक्ती घेण्याची शक्यता नाकारता येत नाही.

S.L.P.D. Patil Social Work College
College Code 225



Scanned with OKEN Scanner

### सामाजिक नैतिक मुल्यांचा ऱ्हास

शिक्षित व्यक्तींच्या हाताला काम न मिळाल्यास तेच हात अनैतिक मार्गाने पोटाची उपजिविका भागविल्याशिवाय राहणार नाहीत. यामुळे सामाजिक नैतिक मुल्यांचा ऱ्हास होऊन समाज अस्थिर झाल्याशिवाय राहणार नाही.

### कौटुंबिक विघटन

बेकारीचा आणखी एक परिणाम म्हणजे कौटुंबिक विघटन होय. कुटुंबातील कर्ता व्यक्ती अर्थ प्राप्ती करण्यास असमर्थ असतो. तेव्हा स्त्रिया घराबाहेर पडून कुटुंबाचा उदरनिर्वाह भागविण्यासाठी हातभार लावतात. परंतु अशा वेळी पाल्यांकडे दुर्लक्ष होते. ही क्रिया जर दिर्घकाळ चालली तर कुटुंबाचे विघटन झाल्याशिवाय राहणार नाही.

### वेश्याव्यवसाय

बेकारीचे आणखी एक दुष्परिणाम म्हणजे वेश्याव्यवसाय होय. पुर्वी भारतीय समाज व्यवस्थेमध्ये स्त्रियांचे स्थान अत्यंत आदराचे होते. कारण पुर्वी भारतात मातृसत्ताक समाज व्यवस्था होती. परंतु निर्माण होत असलेल्या आर्थिक कारणामुळे कुटुंबाचे संगोपन व उपासमार हे वेश्याव्यवसायाचे प्रमुख कारण ठरत आहे. समाज मान्य मार्गाने स्वतःच्या मुलांचे किंवा कुटुंबाचे पोषण करण्यास अशक्य झाल्यास अर्थ उत्पादनाकरीता हाताला काम न मिळाल्यामुळे स्त्रियांना वेश्याव्यवसायाकडे वळावे लागते.

### कार्यक्षमतेवर प्रतिकूल परिणाम

बेकार व्यक्ती स्वतःच्या व कुटुंबातील सदस्यांच्या मुलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी हाताला मिळेल ते काम करत असतो. अशा वेळी व्यक्तीच्या कार्यक्षमतेवर प्रतिकूल परिणाम होत असतो. क्षमतेपेक्षा कमी काम मिळाल्यामुळे व बराच काळ बेकार राहिल्यामुळे व्यक्तीमध्ये असलेले कौशल्ये व कार्यक्षमता यांच्यावर प्रतिकुल परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही.

### समाजावर दुष्परिणाम

बेकारीचे दुष्परिणाम ज्या प्रमाणे व्यक्ती व त्या कुटुंबावर होतात. त्याचप्रमाणे समाजावर ही बेकारीचे दुष्परिणाम होतात. लॉर्ड बेव्हरिज. यांच्या मते, बेकारीचे अत्यंत वाईट व गंभीर दुष्परिणाम शारिरीक नसून नैतिक स्वरुपाचे असतात.

देशात प्रचंड मोठ्या प्रमाणात लोक बेकारीचे जिवन जगत आहेत. त्यांना व त्यांच्या कुटुंबाला अत्यंत हलाकिचे व दारिद्र्याचे जीवन जगावे लागते. याची तीव्रता एवढी असते की, जीवनपणीच मरणयातना भोगाव्या लागतात. बेकार व्यक्तीचे मन रिकामे असतात आणि हात रिकामे असल्यामुळे ते सळसळत असतात. ह्या हातांना विधायक काम करण्याची संधी न मिळाल्यामुळे हेच हात काही दिवसात समाज विघातक स्वरुपाची कृत्ये करु लागतात. बेकार व्यक्तीच्या मनात जमा झालेले असमाधान व चीड जेव्हा असामाजिक व राष्ट्रविघातक कृत्यांसाठी प्रकट होते. तेव्हा समाजातील सर्व आदर्श, नैतिक मुल्ये, उदात्त विचार रसातळाला गेल्याशिवाय राहत नाहीत. उदा. चोरी, बँक दरोडा, सायबर गुन्हे, बलात्कार, उठाव अशी अनेक समाज विघातक उदाहरणे देता येतील.

Smt. P.D. Patil Social Work College College Code 225



Scanned with OKEN Scanner

## बेकारीवरील उपाय

### लोकसंख्येला आळा घालणे

भारतात दरवर्षी रोजगार निर्मिती होते. परंतु लोकसंख्या वृध्दीमुळे देशात निर्माण होणारा रोजगार कमी पडतो. कारण भारतात रोजगार निर्मितीपेक्षा लोकसंख्या वृध्दी दर जास्त आहे. त्यामुळे भारतातील लोकसंख्या वाढीचा दर जो पर्यंत कमी होणार नाही. तो पर्यंत बेरोजगारीवर नियंत्रण ठेवणे व नष्ट करणे शक्य नाही.

### कृषी क्षेत्राचा विकास

भारत हा कृषीप्रधान देश आहे. त्यामुळे अनेक लोकांचा व्यवसाय शेती आणि शेतीशी निगडीत असलेल्या व्यवसायाशी आहे. त्यामुळे कृषी क्षेत्राचा विकास करणे आवश्यक आहे. आधूनिक कृषी साधनांचा उपयोग करुन शेती करणे, फळ शेती, फुल शेती, गट शेती यांच्या माध्यमातून कृषी क्षेत्राचा विकास होणे आवश्यक आहे. विविध फळांच्या प्रक्रियावर आधारित उद्योगांची निर्मिती ग्रामीण भागात करणे आवश्यक आहे. कृषी क्षेत्राचा विकास झाल्यास ग्रामीण बेकारी कमी होईल. ग्रामीण भागातील होणारे स्थलांतर थांबेल.

### कुटीर व लघू उद्योगांचा विकास

कुटीर व लघू उद्योगांचा विकास करण्याच्या दृष्टीने शासनाने विशेष प्रोत्साहन देणे आवश्यक आहे. कुटीर आणि लघु उद्योगांमुळे ग्रामीण क्षेत्रात खुप मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होईल. म्हणून कुटीर व लघू उद्योगांचा विकास करणे काळाची गरज आहे. जपान सारख्या विकसीत देशाने कुटीर व लघू उद्योगांना विशेष प्रोत्साहन देवून देशाचा खूप मोठ्या प्रमाणात विकास साधला.

### रोजगारभिमूख शिक्षण प्रणाली

आज शिक्षण पध्दती दोषपूर्ण असून केवळ कारकून निमितींचा कारखाना आहे. पदवी व पदवित्तर प्राप्त व्यक्ती नोकरी शिवाय काहीच करु शकत नाही. शासन प्रचंड प्रमाणात रोजगार निर्माण करु शकत नाही. त्यामुळे बेकारी दूर करायची असेल तर व्यवसायभिमूख शिक्षण प्रणालीचा अवलंब करणे आवश्यक आहे. जेणे करुन शिक्षण घेतलेला तरुण वर्ग शासनाच्या रोजगाराची वाट न पाहता स्वत:चा रोजगार निर्माण करुन स्वत:च्या पायावर उभा राहिल अशा प्रकारची रोजगारभिमूख शिक्षण प्रणाली आवश्यक आहे.

### माहिती व व्यवसायिक प्रशिक्षण केंद्र

भारत हा खेड्यामध्ये वसलेला देश आहे. त्यामुळे शासनाने विविध व्यवसायिक प्रशिक्षण केंद्र स्थापन करणे आवश्यक आहे. या प्रशिक्षण केंद्राच्या माध्यमातून शासनाच्या कार्यारत असलेल्या विविध योजनांची माहिती देणे. जेणे करुन त्याचा फायदा त्या गावातील बेरोजगारांना होईल. त्यांना रोजगार मिळण्यास सहकार्य होईल. त्यामुळे भारतातील प्रत्येक खेड्यामध्ये माहिती आणि प्रशिक्षण केंद्र उभारणे आवश्यक आहेत.

Smt. P.D. Patil Social Work College Khadki, AKOLA
College Code 225

### राष्ट्रीय धोरण

देशातील सर्व राजकीय पक्षाच्या नेत्यांनी एकत्रित येवून बेरोजगाराच्या संदर्भात एक राष्ट्रीय धोरणाची अंमलबजावणी शासनाने करावी. बेरोजगाराच्या राष्ट्रीय धोरणास सर्व राजकीय पक्ष आणि सामाजिक संघटनांनी पाठिंबा द्यावा. अशा प्रकारच्या बेरोजगारिच्या प्रश्ना संदर्भात राष्ट्रीय धोरण राबविल्यास बरोजगारीचे उच्चाटन करणे अशक्य नाही.

### उद्योगधंद्याचे विकेंद्रीकरण

भारतातील बेकारी कमी करण्यासाठी उद्योगधंद्याचे विकेंद्रीकरण होणे आवश्यक आहे. एका ठिकाणी व एकाच व्यक्तीच्या हातात सर्व उद्योगधंदे न ठेवता अनेक ठिकाणी स्थापना करणे आवश्यक आहेत. तसेच मोठ्या प्रमाणात उत्पादन न करता उत्पादन निर्मितीस मर्यादा घालणे.

### हंगामी बेरोजगारी संबंधी धोरण

कृषी क्षेत्र आणि कृषीवर आधारित उद्योगधंद्यामध्ये हंगामी बेरोजगारीचे प्रमाण प्रचंड मोठ्या प्रमाणात आढळते.

* शेतीतून वार्षिक एकापेक्षा अधिक पिके घेतले पाहिजे.
* वृक्षारोपण, फलोत्पादन, दुध डेअरी आणि पशुपालन यांना प्रोत्साहन दिले पाहिजे.
* लघु व कुटीर उद्योगांना प्रोत्साहन दिले पाहिजे.

### स्वयंरोजगारासाठी अधिक मदत

भारतातील बहुतेक लोक स्वयंरोजगार करुन आपली उपजिविका भागवित असतात. ते लोक शेती, व्यापार, झोपडी आणि लघु उद्योग इत्यादी मध्ये गुंतले आहेत. या व्यक्तींना आर्थिकदृष्ट्या मदत मिळावी. कच्चा माल आणि तांत्रिक प्रशिक्षण दिले जावे.

### संदर्भ ग्रंथ सूची

१) भारतीय समाज प्रश्न आणि समस्या, प्रा. डॉ. सुनीय मायी, डायमंड पब्लिकेशन्स, पुणे
२) भारतातील सामाजिक समस्या, प्रा. पी. के. कुलकर्णी, विद्या प्रकाशन, नागपूर
३) भारतातील सामाजिक समस्या, डॉ. भा. कि. खडसे, श्री. मंगेश प्रकाशन, नागपूर
४) श्रमाचे अर्थशास्त्र, डॉ. प्रभाकर देशमुख विद्या, प्रकाशन, नागपूर
५) भारतातील सामाजिक समस्या, प्रा. ध. ग. गुडधे, संकेत प्रकाशन, अमरावती
6) www.com wikipedia

★★★

Smt. P. K. Patil Social Work College
College Code 225
Khadki, AKOLA



Scanned with OKEN Scanner